## मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ५६१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोपाल बालाजी झाडे<br>८, पुरोहित ले-आऊट, अंबाझरी, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०३३. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. संचालक (प्रशासन)<br>संचालनालय, लेखा व कोषागारे,<br>शासकीय कुटीर क्र. १५ व १६, प्लॉट नं. १७६, फ्रि प्रेस जर्नल मार्ग,<br>मुंबई -४०० ०२१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी<br>संचालनालय, लेखा व कोषागारे,<br>शासकीय कुटीर क्र. १५ व १६, प्लॉट नं. १७६, फ्रि प्रेस जर्नल मार्ग,<br>मुंबई -४०० ०२१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०१०)**

### <u>निर्णय</u>

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी तर्फे सहाय्यक संचालक, लेखा व कोषागारे नागपूर श्री. शेखर सोळके हजर आहेत. (प्राधिकार पत्र दिले आहे).

२. अपीलकर्ता यांनी ०३/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे त्यांचे निलंबनापूर्वीचा व त्यानंतरचा कालावधी आणि निलंबन कालावधीतील वेतनवाढ, अपीलकर्ता यांना दि. २१/०८/१९९५ रोजी कामावर हजर करुन घेण्यात आले.

त्यानंतर १ वर्ष पूर्ण झाल्यावर ०१/०८/१९९६ पासून वेतनवाढ मंजूर केली, ती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ३६ व ३९ किंवा अन्य ज्या नियमान्वये वेतनवाढ मंजूर केली त्या नियमांची प्रमाणित छांयाकित प्रत, तसेच मुद्या क्र. ५, ६, ७ मध्ये वेतन पडताळणीचा जो आक्षेप आहे त्या आक्षेपाच्या संदर्भात नियमावलींची प्रत, अशाप्रकारे एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरचा अर्ज हा दि. १९/०३/२०१० रोजी आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालयातील आस्थापनेशी निगडीत असल्यामुळे त्या कार्यालयामध्ये हस्तांतर केलेला दिसून येतो. तरीही अपीलकर्ता यानी दि. ३१/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात ते हस्तांतर करता येत नसल्यामुळे सहसंचालक, उपायुक्त (प्रशासन) अथवा अपील अधिकारी, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना हस्तांतरीत केलेले अपील परत पाठविण्यात आले. पून्हा दि. ११/०५/२०१० रोजी अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांनी उपस्थित राहण्यास दि. १५/०५/२०१० च्या पत्रान्वये आक्षेप घेतला असल्यामुळे निर्णय झालेला दिसून येत नाही. परंतु तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि. २८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या मूळ विभागात सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी ज्या नियम अथवा नियमावलीनुसार मागणी केलेली वेतनवाढ प्रलंबित ठेवली त्या नियमांची प्रमाणित छायाप्रत त्यांना मागितली व सहाय्यक आयुक्त (लेखा) हे जो आक्षेप घेतात तो अस्तित्वात नसलेल्या नियमांमधून घेतला आहे. त्यांचे मूळ विभागाचे संचालनालय लेखा व कोषागारे असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागितलेली होती. कारण जो पर्यत घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करता येत नाही तो पर्यंत मूळ विभागास कोणतीही कार्यवाही करता येत नाही. परंतू घेतलेला आक्षेप हा नियमांप्रमाणे आहे किंवा नाही याबद्यलची माहिती मागितलेली होती. कारण जो आक्षेप घेतलेला आहे तो आक्षेप नसून प्रत्यक्षात वेतनवाढ द्यावी किंवा नाही अशाप्रकारचा निर्णय आहे. या आक्षेपाचे निराकरण मूळ विभागाकडून करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. म्हणूनच लेखा व कोषागारे संचालनालयाकडूनच माहिती मागितलेली होती, व त्या माहितीच्या आधारेच म्हणजेच नियमाच्या आधारेच मूळ विभागाकडून आक्षेपांचे निराकरण झाल्याचे निदर्शनास आले असते. जो पर्यंत वित्तिय अधिकाऱ्याने जो शेरा दिलेला असतो त्याचे निराकरण होत नाही तो पर्यंत मूळ विभाग कोणतीही जबाबदारी स्विकारण्यास तयार नसतो.

सदरची वेतन पडताळणीची बाब लक्षात घेता दुग्ध व्यवसाय विकास आयुक्तांनी सुध्दा नियमावली दाखविण्याचा आदेश दिला होता. ती नियमावली माहितीच्या अधिकारात मागितलेली होती किंवा नाही, कारण त्यानंतरही वेतनवाढ ही सुरु करण्यातच आली नव्हती. परंतु अपीलकर्ता यांनी पुढे असेही सांगितले की, संबंधीत सहाय्यक आयुक्त (लेखा) यांनी घेतलेल्या आक्षेपाप्रमाणे नियमावली अस्तित्वात नाही असे त्यांना कळविले आहे. याचाच अर्थ त्यांना त्या नियमावलीच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली आहे. आता प्रश्न कार्यवाहीचा उरतो. व त्याकरीता आयुक्त यांचेकडे अपीलकर्ता यांनी तक्रार करणे योग्य राहील. तरीसुध्दा घेतलेला आक्षेप वजा आदेशाच्या संदर्भामध्ये सह संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे यांना स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांच्या विभागास पत्र पाठविणे संयुक्तिक राहील. व तशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक लेखा व कोषागारे यांना वेतन पडताळणी पथकाने घेतलेल्या आक्षेप वजा आदेशाच्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण हे आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालयात पाठविणे व तशी माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ५६५/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. देवराव नत्थुजी चटप<br>२०, ओंकार नगर, पोष्ट - पार्वतीनगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०२७. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षाणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**अपील क्र. ५६४/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद (वित्त विभाग) नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ५. | जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर<br>सिव्हिल लाईन्स , नागपूर | | |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते

त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी दिनांक १९/०४/२०१० रोजी दोन द्वितिय अपीले दाखल केलली आहेत.

२. अपील क्र. ५६५ / २०१० मध्ये दि. २०/०१/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नागपूर यांचे पत्र क्र. १४६६ दि. २०/०३/२००३ नुसार नागपूर जि.प. मधील एस.टी. सी. ट्रेंड शिक्षकांना (लाभार्थी शिक्षक ११८ रुपये २०,००,३३५/- विस लाख तीनशे पसतीस) नियमा प्रमाणे थकबाकी देण्यात आली. त्याबाबत अर्ज केला होता. त्या अनुषंगाने सुनावणी घेण्यात आली. परंतू अहवाल प्राप्त झाला नाही. त्या अहवालाची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०४/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली व त्यासोबत एकूण ६ उपपत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा १९/०४/२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी द्वितिय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत त्या कागदपत्रांमध्ये चुकीची माहिती दिलेली दिसत आहे. ज्या आदेशाची सुनावणी घेतली त्या तारखेचा अहवाल दिसून येत नाही व त्यामुळेच ती चुकीची माहिती आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू जशी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या तशाच कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. याचा अर्थ माहिती जशी आहे ती तशीच उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता हे त्या माहितीवरील गुणवत्तेबाबत तक्रार करीत आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील खारीज करावे अशी त्यांना विनंती केलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या सहपत्राचे अवलोकन केले असता माहिती जशी आहे तशीच उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्र. ५६४/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. ०१/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी व मुख्य लेखाधिकारी, तथा वित्त अधिकारी या कार्यालयात झालेल्या सुनावणीच्या कार्यवृत्ताची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे पाठवावी असे नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे दि. २४/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २८/०५/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

६. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. जी माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे त्या माहितीच्या संदर्भात ते आक्षेप घेत आहेत. परंतु माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे चुकीची माहिती दिलेली आहे असे म्हणता येत नाही. असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती ही माहिती अधिकाऱ्यांकडे जशी ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्यानुसार कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात मिळते. अर्जदाराच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारीच्या संदर्भात कोणतीही चौकशी आयोगास करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जशी माहिती उपलब्ध आहे तशीच उपलब्ध झालेली असल्याने त्यांनी योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वयं स्पष्ट असा निर्णय दि. २८/०५/२०१० रोजी दिलेला असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१.        अपील क्र. ५६४/२०१० व ५६५/२०१० हे खारीज करण्यात येते.

२.        अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**अपील क्र. ५६२/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राहूल विजय तारेकर<br>प्लाट नं. जी. ८२, गायत्रीनगर, आय टी पार्कच्या मागे, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०३३. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>शिक्षण विभाग, महानगर पालिका नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>शिक्षण विभाग, महानगर पालिका नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०१०)**
**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी शिक्षण विभाग महानगर पालिका सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे दिनांक ०१/०१/१९९२ ते ३१/१२/२००० पर्यंत शिक्षकांच्या झालेल्या भरतीच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र पोस्ट टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २६/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले. जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांना खुलासा दाखल करतांना निवड यादीची माहिती विलंबाने प्राप्त झाली. तसेच कार्यालयातील अडचणींमुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. (उदा. मागील ६ - ७ महिन्यापासून झेरॉक्स मशीन बंद आहे, वेळेवर कोरे कागद उपलब्ध होत नाही. ) परंतू संपूर्ण माहिती तयार आहे. माहिती बाबत म. न. पा. च्या फंडात शुल्क भरण्यास दि. ३१/०५/२०१० रोजी पत्र दिलेले आहे. त्यानुसार संबंधितांनी, मागणी प्रमाणे माहिती तथा कागदपत्रे तयार आहेत असा खुलासा दिलेला आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाची दखल घेतलेली नाही. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. मात्र आयोगाची नोटीस दि. १३/०५/२०१० रोजी निर्गमित झाल्याने दि. ३१/०५/२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी एकूण ५० प्रतीबाबत शुल्क दर प्रती रुपये २/- प्रमाणे रुपये १००/- इतका अतिरिक्त खर्च मागितलेला आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांना खर्च भरण्याचे कळविले व त्यांनी खर्च भरला नाही म्हणून माहिती दिलेली नाही असे भासवून आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतू आज आयोगापुढे जे अधिकारी उपस्थित झाले आहेत त्यांची आकलन शक्ती काय आहे हे दिसून येत नाही. परंतू ते बनवाबनवी मात्र छान करतात. त्यांना व प्रथम अपीलीय अधिकारी यांना महितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची माहिती आहे असे दिसत नाही. तसेच आलेल्या अर्जाप्रमाणे माहिती न देण्याची प्रवृत्ती त्यांच्यात दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे व मुदतीत माहिती दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्याने शास्तीस पात्र आहेत. जनमाहिती अधिकारी यांना शास्ती बद्यल विचारलेले असता चूक झाली पुढे असे होणार नाही एवढेच त्यांनी आयोगापुढे सांगितले परंतु या मुद्याम झालेल्या चूकीबद्यल शास्ती करणे आवश्यक असते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल न घेतल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यांचेविरुध्द म.न.पा. आयुक्त यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती व छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत ३० दिवसांत माहिती दिलेली नाही व माहिती देण्याची टाळाटाळ करुन आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द म.न.पा. आयुक्त यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

५. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे म.न.पा. आयुक्त यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**अपील क्र. ५८०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिपक बाबुराव म्हसलकर<br>मारोतीभाऊ समाधी परिसर, जुनी म्हाडा कॉलनी जवळ, सिंदी (मेघे)<br>वार्ड नं. ५, वर्धा ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा तलाठी बोरगांव (मेघे)<br>सा. क्र. १९, तलाठी<br>तहसिल कार्यालय वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०३/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता उशीरा हजर झाले. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी बोरगांव (मेघे) यांचेकडे (फेरफार पत्रकाचे) पानं. नं. ४० ते ४७ च्या सत्यप्रती मला देण्यात याव्या अशी मागणी केली आहे. दि.०१ मे २००८ ते १ ऑक्टोबर २००८ या कालावधीतील सदर माहिती असून माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२२/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.१७/०३/२०१० रोजी देण्यात आलेला आहे.

अपीलार्थीला माहिती दि. ११/०३/२०१० रोजी देण्यात आली आहे. विहित मुदतीत माहिती पुरविणे आवश्यक होते, परंतू वसूलीच्या कामात अतिव्यस्ततेमुळे माहिती देण्यास उशीर झाला असल्याचे कारण दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलात मिळालेल्या माहितीमध्ये फेरफारांची नोंदवहीचे (फेरफार पत्रक) पान नं. ४२ मिळाले नाही. नोंदीचा अनुक्रमांक ८२७३ मध्ये अक्षरामध्ये बदल स्पष्टपणे दिसून येत आहे. नोंदीचा अनुक्रमांक ८२७४, ८२७५, ८२७६, ८२७७, ८२७८, ८२७९, ८२८०, ८२८१, ८२८२, ८२८३, ८२८४, ८२८५ खोडतोड करुन पुन्हा लिहिलेले स्पष्टपणे दिसून येत आहे. चाचणी अधिकाऱ्याची अद्याक्षरी किंवा शेरा नावाच्या कॉलममध्ये मा. मंडळ अधिकाऱ्यांच्या सहयांच्या तारखा मागेपुढे लिहिलेल्या दिसत आहे. व तसे युक्तिवाद करतांना सुध्दा त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू महसूल वसूलीच्या कामामध्ये व्यस्त असल्यामुळे विलंब झालेला आहे. अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण आहे असे जनमाहिती अधिकारी यांना सांगितले असता ते असे म्हणतात की, फेरफार नोंदवहीचे सर्व पृष्ठ जसे आहेत तसेच अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, माहिती मागितल्यानंतर पुन्हा खोडतोड करण्यात आलेली आहे. तसेच ४२ नं. चे पृष्ठ हे सुध्दा गहाळ करण्यात आलेले आहे.

४. अपीलकर्ता यांना माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याकरीता जनमाहिती अधिकारी यांनी जे कारण दिलेले आहे ते कारण संयुक्तिक वाटत नाही. अपीलकर्ता यांनी दि.११/०१/२०१० रोजी अर्ज केला व त्यांना माहिती ही दि.११/०३/२०१० रोजी देण्यात आली म्हणजेच ती माहिती ६० दिवसांनी देण्यात आली. दिलेली माहिती ही संयुक्तिक नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. ते महसूल वसूलीमध्ये व्यस्त असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला असे त्यांनी पुन्हा कारण दिले. परंतू ते कारण वर नमूद केल्याप्रमाणे संयुक्तिक नसल्याने ते

शास्तीस पात्र आहेत. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये पृष्ठ क्र.४२ नाही व इतर पृष्ठांमध्ये सुध्दा खोडतोड केलेली आहे. "महाराष्ट्र पब्लीक रेकॉर्डस् ॲक्ट २००५" चे कलम '९' प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मूळ अभिलेखाची तपासणी करण्याकरीता जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्यादिवशी उपस्थित राहून संबंधित अभिलेखाची तपासणी करुन त्यांना मिळालेल्या माहितीची पडताळणी करुन घ्यावी. त्याकरीता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांना संबंधीत अभिलेखाची तपासणी करण्यासाठी संबंधीत अभिलेखे उपलब्ध करुन द्यावे.

२. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रुपये १०००/- ची शास्ती, अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.५८३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भगवंत नारायणराव साखरकर<br>श्री. शामराव भोमले यांचे मकान, पी ॲण्ड टी कॉलनी, साईनगर, वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत विभाग)<br>जिल्हा परिषद वर्धा.<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>(ग्राम पंचायत विभाग) जिल्हा परिषद कार्यालय वर्धा.<br>ता.जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र.५८४/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण विभाग)<br>जिल्हा परिषद वर्धा. ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ५. | जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>(महिला व बालकल्याण विभाग) जिल्हा परिषद कार्यालय वर्धा.<br>ता.जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. २९/०४/२०१० व ३०/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०१०

रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ५८३/२०१० मध्ये दि. २३/०२/२०१० रोजी श्री. ए. सी. खडतकर माजी ग्रामसेवक यांचे विभागीय चौकशीच्या संदर्भात त्यांनी दिलेले दि. ०६/१२/२००७ व ०२/१२/२००७ च्या पत्राच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती, श्री खडतकर यांनी दि. ०७/०१/२०१० च्या ग्रामपंचायतीचे बँक खात्यातून काढलेल्या रकमेबाबत तक्रारी सह प्रमाणक क्रमांक मा.ग्रा.वि. कारंजा (घाटगे) यांचा चौकशी अहवाल व दस्तऐवज, आपण पाठविलेले एफ.आय.आर. दर्ज करण्याबाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश पत्र, या सर्वांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती व वित्त विभागातील शासन निर्णय मागितलेला दिसून येतो. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि.०६/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये दोन्ही प्रती जिल्हा परिषद (ग्राम पंचायत विभाग) वर्धा, या कार्यालयात उपलब्ध नाहीत, याबाबत त्यांना दि.०५/०३/२०१० ला नस्ती दाखविण्यात आलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे दिसून येते. श्री. ए. सी. खडतकर, सक्तीने सेवा निवृत्त ग्रामसेवक यांचे संबंधात माहिती मिळण्याकरीता पंचायत समिती कारंजा, अंतर्गत ग्रामपंचायत समिती एकार्जून, येथे केलेल्या अफरातफरीचे प्रकरणाची कार्यवाही सुरु असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमात नमूद ८ (ज) च्या तरतुदीं नुसार याबाबत तूर्त माहिती देता येणार नाही. शासन निर्णयाची मागणी केलेली आहे. परंतू शासन निर्णय कोणत्या बाबींचा आहे याबाबत अर्जात उल्लेख नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०६/०४/२०१० रोजी देण्यात आलेला असून चौकशी अहवालाच्या संदर्भात एफ.आय.आर. दर्ज करण्याबाबतच्या प्रतीची मागणी केली. परंतू अधिनियमाचे कलम ८ (ज) प्रमाणे कार्यवाही सुरु असल्यामुळे कागदपत्रे पुरविता येत नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच रजा रोखीकरणाच्या संबंधीत शासन निर्णय - वित्त विभाग, मंत्रालय मुंबई दि.१५.०१.२००१, व शासन निर्णय ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई, दि. ३०/०६/२००४ ची प्रत व श्री खडतकर यांचे संदर्भात चौकशी अहवाल, FIR दर्ज करण्याबाबतच्या पत्राची प्रत, मागितली परंतू कार्यवाही सुरु असल्यामुळे माहिती देता येत नाही असे सांगितले. परंतू त्यानंतर फक्त शासन निर्णयाची माहिती उपलब्ध

झाली. मात्र FIR ची प्रत व चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, श्री ए.सी. खडतकर यांचे संदर्भात दि. ०६/०३/२०१० रोजी जी माहिती देण्यात आलेली आहे ती अपूर्ण आहे. व त्यात माहिती उपलब्ध नाही असे म्हणण्यात आले आहे. चौकशी प्रकरणी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले आहे. शासन निर्णय मिळाला आहे त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आता चौकशी पूर्ण झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी श्री ए. सी. खडतकर यांच्या संदर्भात जी काही माहिती मागितलेली आहे ती सर्व उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्र. ५८४/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०/०४/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता व उत्तरवादी दोघेही हजर आहेत. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ५८४/२०१० मध्ये दि. २३/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचेकडे विभागीय चौकशी दरम्यान सादर कर्ता अधिकारी तथा कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जि.प. वर्धा यांनी बालविकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि. सेवा योजना हिंगणघाट यांचे अधिनिस्त असलेले शासकीय वाहन सुनावणी दरम्यान नागपूर येथे जिल्ह्याबाहेर दौऱ्याकरीता आणले होते. त्याकरीता त्या तारखेचे लॉगबुक रजिस्टर क्रमांक सह दौरा नोंदणी सह्या सह पेज क्रमांकसह त्या दिनांकाची लॉग बुकची प्रमाणित झेरॉक्स प्रत, त्या दिनांकाची डिझेलची भरणा पावती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे त्या दिनांकाचे जावक क्रमांक सह लेखी परवानगी पत्र व सादर टिपणीची प्रमाणित झेरॉक्स प्रत इ. बाबत माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२६/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती विहित मुदतीत दिली नाही या कारणास्तव प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण विकास विभाग) तथा माहिती अधिकाराचे प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळें राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती मिळालेली नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांना दि.२६/०३/२०१० रोजी खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिले. परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. २६/०३/२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिले आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना दिनांक २६/०३/२०१० रोजी पाठविण्यात आले आणि दि.१६/०४/२०१० रोजी प्राप्त झाले. त्यामुळेच अपीलकर्ता यांना त्यांचे मूळ अर्जाप्रमाणेच माहितीकरीता खर्चाचा भरणा करण्याचे पत्र विलंबाने दिले असा अपीलकर्ता यांचा समज आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती एकात्मिक बालविकास सेवा योजना हिंगणघाट येथील आहे व त्या कार्यालयामध्ये जनमाहिती अधिकारी हे नियुक्त झालेले आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजना हिंगणघाट येथील माहिती अधिकारी आज आयोगापुढे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा अर्ज त्यांना दि. १०/०३/२०१० रोजी प्राप्त झाला व त्यामुळे दि. २६/०३/२०१० रोजी हे पत्र मुदतीत देण्यात आले आहे. माहिती ही हिंगणघाट येथील कार्यालयातील असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने मिळालेली आहे असे वाटते. माहिती ज्या कार्यालयातील आहे त्या कार्यालयात त्यांनी माहिती मागणे आवश्यक आहे. जर ३० दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे तर वरीष्ठ कार्यालयाकडून ती ३० दिवसातच उपलब्ध होईल असे नाही. कारण सार्वजनिक प्राधिकरणात नियुक्त्यांमध्ये बदल करणे हे अधिकारक्षेत्रात येत नाही. असे अधिनियमाचे कलम ७ (३) अन्वये अतिरिक्त खर्चाचा भरणा देण्याचे पत्र दिल्याचे दिसून येते. तर अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्याच्या कालावधीची ३० दिवसाच्या कालावधीत परिगणना करण्यात येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्याचे पत्र हे मुदतीत देण्यात आले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ५८३/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचे दि.२३/०२/२०१० च्या अर्जात मुद्या क्र. १ व २ प्रमाणे मागितलेल्या माहितीचे संपूर्ण कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ५८४/नाग/२०१० हे निकाली काढण्यात येते.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.५८२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजू उकंडराव थुल<br>मु. समतानगर, दयाल नगरचे मागे, वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद वर्धा.<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी<br>(प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद वर्धा.<br>ता.जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १३/०३/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील स. अ. पदवीधर शिक्षक, उच्चश्रेणी मु.अ. केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी यांचे रोस्टर (अ.जा.अ.ज. वि.भ. विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, अपंग) यादीसहीत माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने माहिती दि. ०८/०४/२००९ रोजी मागितलेल्या माहिती करीता ४ पानांची माहिती प्रती पृष्ठ रुपये २ प्रमाणे रुपये ८ /- या कार्यालयातील रोखपाल यांचेकडे जमा करुन पावती अधिक्षक यांना दाखवून माहिती घेवून जावी असे कळविल्याचे दिसून येते.

त्यानुसार अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त करुन घेतली. परंतू प्राप्त झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांनी दि.०१/१०/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील हे मुदतबाहय असल्यामुळे फेटाळण्यात आलेले आहे. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती प्राप्त झाली आहे त्यात फक्त विस्तार अधिकारी यांचे रोस्टरची झेरॉक्स प्रत प्राप्त झाली आहे. परंतू रोस्टर तयार होण्याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाला असे सांगितले की, इतर पदांच्या संदर्भामध्ये रोस्टर तयार करण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतू आता रोस्टर तयार झाले आहे. त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल.

४. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील ६ महिन्यानंतर दाखल केले. व दाखल केलेले अपील पुन्हा ६ महिन्यानंतर दाखल केले. दोनही अपील हे मुदतबाहय दाखल केलेले आहेत. ती तांत्रिकदृष्ट्या फेटाळणे आवश्यक आहेत. परंतू माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मुदतबाहय असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने ते अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांनी मागितलेले इतर पदांचे रोस्टर ची माहिती विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.५६३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुनिल जॅकब<br>यीशु हाऊस, ६४०/बी, N.T.C.D.C. कॉलोनी,<br>खलाशीलेन, नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (राजस्व)<br>जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर<br>सिव्हिल लाईन्स, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे तलाठी श्री. संजय राठोड हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचे तर्फे स्वीय सहाय्यक श्री अवनाके हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९/०९/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (राजस्व) जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे जमिनीचे संबंधीत मौजा पिटीचुवा, ठाणा व सिंदीविहिरी, संबंधी दि. १६/०२/२००८ चे पत्र क्र. ६४३/०८, दि. २६/०२/२००८ पत्र क्र. २२८/०८, दि. १८/०२/०८ पत्र क्र. १७६/०८, दि. २४/०६/२००८ पत्र क्र. ७१५/०८ व दि.२४/०७/२००९ पत्र क्र. ९४३/०९, के पत्र मा. उपविभागीय अधिकारी उमरेड, तहसील, जिल्हा नागपूर को पत्र भेजने पर कौन कौनसी कार्यवाही महसूल नियमानुसार की गई अथवा की जायेगी और मा. उपविभागीय अधिकारी, उमरेड द्वारा

आजतक कोई भी पत्र द्वारा नियमित कारवाई ना करने पर कौनसे नियम के अनुसार गरीब किसानो को उनका हक अधिकार मिल सकता है | उपविभागीय अधिकारी, उमरेड द्वारा दोषी अधिकारीयों पर किस नियम के अंतर्गत कारवाई करेंगे और दंडीत करेंगे अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसते. अर्जाच्या संदर्भात माहिती ही उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडील असल्याने सदरचा अर्ज दि.०१/१०/२००९ रोजी त्यांचेकडे हस्तांतर करण्यात आला व अपीलकर्ता यांना पत्राची प्रत देण्यात आली असे दिसते.

३. माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी दि. २३/११/२००९ रोजी वरील पत्रांवर महसूल नियमांनुसार कार्यवाही सुरु असल्याने कार्यवाहीची छायांकित प्रत देता येत नाही असे पत्र दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी दि. ०६/०१/२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली नाही याकारणास्तव प्रथम अपील अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२०/०२/२०१० रोजी देण्यात आला असून माहितीच्या अर्जावरील दि. २३/११/२००९ रोजी अपीलार्थीस दिलेल्या उत्तराची प्रत अपीलार्थीस मिळाली नाही. माहिती अर्जातील सर्व नमूद दिनांकाच्या तक्रारींवर उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे महसूल नियमानुसार कार्यवाही सुरु असल्याने अपीलार्थीस माहिती देता येत नाही या उत्तराशी प्रथम अपील कार्यालय सहमत आहे. यावरील कार्यवाही पूर्ण झाल्यावर मुद्या क्र.१ बाबतची माहितीची मागणी अपीलार्थीने माहिती अधिकारी यांना करावी तसेच मुद्या क्र. २ बाबतची माहिती मुद्या क्र.१ ची कार्यवाही अपूर्ण असल्याने त्याबाबत काहीही निर्णय देणे योग्य वाटत नाही. करीता माहिती अधिकारी यांनी दि.२३/११/२००९ रोजी दिलेल्या पत्राची छायांकित प्रत या कार्यालयाकडून अपीलार्थीस तात्काळ देवून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता दि.२३/०२/२०१० रोजी दि.२३/११/२००९ च्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मागितलेली माहिती तपशीलात स्पष्टपणे अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही. तसेच जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी माहिती आहे व ती विलंबाने देण्यात आलेली आहे.

४. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी अर्जामध्ये जी पत्रे दिलेली आहेत त्या पत्रांच्या संदर्भात कार्यवाही सुरु नाही. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांनी नमूद केलेल्या सर्व खसऱ्यांच्या संदर्भामध्ये त्यांना दि.०७/०४/२००८ रोजी तहसीलदार उमरेड निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे प.ह.नं. २५ मौजा - पिटीचुवा, प.ह.नं. १३ मौजा - ठाणा मधील खसऱ्यांची निष्पक्ष चौकशीचा अहवाल सादर केल्याची प्रत मिळालेली आहे. त्या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रारी केलेल्या होत्या व त्याच संदर्भातील सर्व पत्रे ही उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे हस्तांतरीत करुन त्याबाबतच्या चौकशीचा अनुपालन अहवाल द्यावा असा आदेश जिल्हाधिकारी यांनी दिलेला आहे. त्या आदेशाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली असे अपीलकर्ता यांनी विचारलेले आहे. दि.०७/०४/२००८ च्या अहवालावर जे निष्पन्न झाले आहे त्या संदर्भामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता प्रमाणे R.T.I. अपील दाखल करणे आवश्यक असते. व त्या R.T.I. अपीलाच्या चौकशीत जे फेरफार झाले आहे त्या फेरफारीच्या संदर्भात ते योग्य आहे किंवा अयोग्य आहे हा निर्णय मिळू शकेल व त्याची प्रक्रिया उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे सुरु आहे व तशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन दिली असे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांनी नमूद केलेले सर्व अर्ज हे उपविभागीय अधिकारी यांचेकडेच जिल्हाधिकारी यांनी चौकशी करीता पाठविलेले असल्याने अर्जाचे हस्तांतरण उपविभागीय अधिकारी यांचेकडे झाले. परंतू त्या कालावधीत विधानसभा निवडणूका असल्यामुळे व सर्व महसूल कर्मचारी, अधिकारी हे निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला. त्यात कोणत्याही प्रक्रारे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. R.T.I. अपीलाच्या चौकशीत ज्या जमीनीच्या संदर्भामध्ये R.T.I. अपीले सुरु आहेत त्यातील व्यवहार हे गुंतागुंतीचे असल्यामुळे व जूने असल्यामुळे त्याबाबतचे सर्व पुरावे गोळा करणे व निर्णय देणे यास विलंब लागण्याची शक्यता तर असतेच, परंतू कार्यवाही सुरु आहे ही बाब अपीलकर्ता यांना सुध्दा माहित आहे. ते R.T.I. अपीलास हजर असतात त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले जिल्हाधिकारी यांचे बाकीच्या पत्रांचे संदर्भातील जी कार्यवाही सुरु आहे त्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या छायांकित प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांनी मागितलेल्या त्यांच्या दि. २९/०९/२००९ च्या अर्जातील नमूद केलेल्या जिल्हाधिकारी नागपूर यांचे आदेशाच्या संदर्भात सुरु असलेली कार्यवाहीची (त्या स्तरावर असेलली अद्यापपर्यंतची) माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**अपील क्र.५८१/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामराव रघुनाथजी कावळे<br>मु . पो. हिगणी<br>ता. सेलू जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थितीत राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १६/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे वर्धा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांची सिनीऑरीटीप्रमाणे लिस्ट वर्ष १९८० ते आजपर्यंत मिळण्याबाबत अशी माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.०८/०१/२०१० रोजीचे पत्र क्र. २० प्रमाणे रुपये ७२०/- चा भरणा दि. १६/०१/२०१० पर्यंत करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ७२०/- चा भरणा दि.०२/०२/२०१० रोजी केला. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. ०३/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

परंतू अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही या कारणास्तव दि. २४/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२२/०३/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी दि.०२/०२/२०१० रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यावर सुध्दा त्यांना माहिती ही दि.२४/०२/२०१० पर्यंत मिळाली नाही हे निश्चित व त्यामुळे त्यांनी पुन्हा अपील दाखल केले आहे. ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सोयीस्कर रित्या प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये घेतलेली नाही. व त्यानंतरही सदरची माहिती ही २२/०३/२०१० रोजी म्हणजेच सुनावणीच्या तारखेस देण्यात आली. याचा अर्थ अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यावर सुध्दा माहिती ही तयार असून व पत्र सुध्दा तयार असून उपलब्ध करुन न देता निष्काळजीपणे विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेला खर्चाचा भरणा हा त्यांना परत करणे संयुक्तिक राहील. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात नियंत्रण दिसून येत नाही. दि.०३/०२/२०१० रोजीचे पत्राची माहिती ही अपीलकर्ता यांनी नोंदणीकृत शिघ्र टपालाद्वारे मागितली आहे परंतू त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यांनी केलेला खर्चाचा भरणा रुपये ७२०/- हे अपीलकर्ता यांना परत करावे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे व आयोगाची सुध्दा दिशाभूल केल्याच्या प्रयत्नांमुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसूली ही जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे

वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". जमा करण्यात यावी. तसे न केल्यास पुन्हा जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

सदर शास्तीची वसूली ही जिल्हाधिकारी वर्धा यांना करावयाची आहे त्याकरीता सदर निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.६१०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेश शालिकराम दुरुगकर<br>श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>(सा.प्र.विभाग) जिल्हा परिषद गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.०३/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी (सा.प्र.विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे गट ग्रामपंचायत डोंगरगाव ता. गोंदिया अंतर्गत विविध योजना किवा गाव समिती अंतर्गत गोंदियाकडून गट ग्रामपंचायत डोंगरगावला केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या अनुदानाच्या अंतर्गत झालेल्या कामाचे विवरण, छायांकित प्रत मिळणेबाबत खालीलप्रमाणे मुद्दे प्रस्तुत केले आहेत.

अ) डोंगरगाव, किंडंगीपार, फत्तेपुर विविध योजनांमध्ये गाव समितीतल्या व ग्रामपंचायत 'गट' डोंगरगांव दिलेले, अनुदान व खर्च, ब) मोजमाप पुस्तीका, क) ड्राईंगची झेरॉक्स ड) काम झालेले स्थळ, इ) दिलेले चेक,

ई) संमितीचे बँक ट्रायजेशर रिपोर्ट कॉपी, इ. छायांकित प्रती योजनाप्रमाणे टपालाने द्यावी अशी मागणी केलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०३/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०२/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर त्यांना दि.०३/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांना प्रत्यक्षपणे मिळाली नाही व जी माहिती दि. ०३/०३/२०१० रोजी मिळालेली आहे त्यात महाजलच्या विहिरीच्या बद्यल कोणतीच माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे त्यांनी अर्ज हा दि. ०३/०३/२०१० रोजी म्हणजेच त्याचदिवशी पंचायत विभागाला पाठविला. पंचायत विभागाने सदरचा अर्ज दि. ०८/०२/२०१० रोजी ग्रामपंचायतीस पाठविला. तो ग्रामपंचायतीस दि. २०/०२/२०१० रोजी पाठविला. त्यानंतर त्यांना दि.०३/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. वास्तविक माहिती ज्या कार्यालयामधील आहे त्या कार्यालयातच माहितीचा अर्ज केल्यास ३ दिवसांमध्ये माहिती मिळू शकते. अपीलकर्ता यांना माहिती ही कोणत्या स्तरावरील आहे याबद्यलची जाणीव आहे. तरीसुध्दा त्यांनी माहिती जिल्हा परिषद येथील अधिकाऱ्यांना मागितली त्यामुळे याबाबत विलंब झाल्याचा विचार करता येत नाही. माहिती अपूर्ण दिली या संदर्भामध्ये ग्रामपंचायतीस जनमाहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही पूर्णपणे मोघम अशी आहे व ती कोणत्याही निश्चित पाणी योजने विषयी मागितलेली नाही. त्यामुळे माहिती कोणती द्यावी व कोणती देवू नये याबद्यल निंश्चित निर्णय देता आलेला नसल्यामुळे जी उपलब्ध आहे ती माहिती पुरविण्यात आलेली आहे. महाजल विहिरीच्या संदर्भामध्ये ती गाव समिती असते व झालेल्या प्रकाराच्या संदर्भाच्या अंतर्गत उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे नियंत्रण असते. तसेच ग्राम पंचायत समिती यांचे माध्यमातून नियंत्रण असते. पंरतू अद्यापही त्याबाबतची माहिती ही जरी ग्राम पंचायतीच्या अधिकार कक्षेतील असली तरी ग्रामपंचायती संबंधीत ती ग्राम पंचायत सचिवांकडून मिळेलच असे नाही. त्यासंबंधीत त्यांना गाव समिती अध्यक्षास आणि सचिवास माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिलेले आहे.

परंतू त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. कार्यकारी पंचायत यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्या समितीला रुपये ६,७८,०००/- चा धनादेश दिलेला आहे. व त्या समितीच्या संदर्भात सुध्दा कार्यवाही सुरु आहे. परंतू हिच माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यातर्फे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाल्यावर उपलब्ध करुन देता आली असती. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी प्रथम अपील पुन्हा जिल्हा परिषदे कडेच पाठविले. ही माहिती ग्राम पंचायत पातळीवरील असल्याने माहितीचा अर्ज हा त्यांनी ग्राम पंचायत सचिवांकडून करुन अपील हे गट विकास अधिकारी यांचेकडे केले असते तर प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा मुदतीत झाली असती. परंतू अर्ज किंवा प्रथम अपीलाचे हस्तांतरणाला मुळातच विलंब झाला आहे. तरी सुध्दा ०७/०६/२०१० रोजी अपीलाची सुनावणी ग्राम पंचायतीने घेतली. व त्यात मोजमाप पुस्तिका व बँकेचे स्टेटमेंट इ. बाबी दाखविता येऊ शकले नाही. कारण गाव समितीने कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नव्हती परंतू त्यांचेविरुध्द स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना कार्यवाहीची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांनी दिलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती सुध्दा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी महाजल योजने अंतर्गत गाव समितीच्या विरुध्द केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.६०९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री फुलचंद नत्थुजी राउत<br>मु. पो. चिचगड<br>ता. देवरी जि. गोंदिया - ४४१६१४ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी<br>पंचायत समिती देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती देवरी यांचेकडे चिचगड ग्राम पंचायत येथे सन १९७७-७८ सन १९८८-८९ सन २००६-२००७ ह्या तीन वर्षाचे प्रोसिडिंग बुकचे (ठराव रजिस्टर) चे संपूर्ण झेरॉक्स प्रती व्यक्तीशः घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून दि.०९/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात गट विकास अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा जी.डी. चारथळ ग्राम

सेवक ग्रामपंचायत चिचगड यांनी दि.०५/०३/२०१० रोजी सन १९७७-७८ ची माहिती सात दिवसांचे आत पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू माहिती उपलब्ध झाली म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना सन २००७-२००८ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. ती त्यांच्याकडे सुध्दा आहे. सन १९७७-७८ या कालावधीतील प्रोसिडिंग बुक च्या छायांकित प्रती आवश्यक आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सन १९७७-७८ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात आढळलेली नाही. त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. त्याबाबतचा शोध घेणे सुरु आहे. विलंबाच्या संदर्भामध्ये दि.०७/०१/२०१० चा अर्ज हा पंचायत समिती कार्यालयास उपलब्ध झालेला नाही. परंतू अपीलकर्ता यांनी तो पोस्टाने पाठविलेला दिसून येतो. दि.०५/०३/२०१० रोजी दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती घेवून जाण्याबद्यल दि. १०/०३/२०१० रोजी च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतू त्यांनी ती माहिती घेतलेली नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, २००७-२००८ चे प्रोसिडिंग बुक आहे व १९७७-७८ चे प्रोसिडिंग बुक नसल्यामुळे व ते आवश्यक असल्याने त्यांनी माहिती घेतलेली नाही. जनमाहिती अधिकारी तसेच खंड विकास अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा शोध घेणे सुरु आहे व ती मिळाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. परंतू पुन्हा कसून शोध घेण्यासाठी विस्तार अधिकारी यांनी स्वतः ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून सन १९७७-७८ च्या प्रोसिडिंग बुकचा कसून शोध घेणे संयुक्तिक राहील व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसा अहवाल आयोगापुढे सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेल्या माहितीचा कसून शोध घेण्याचे विस्तार अधिकारी यांच्या देखरेखीखाली कसून शोध घ्यावा व सन १९७७-७८ चे प्रोसिडिंग बुक उपलब्ध झाल्यास तशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. व उपलब्ध नसल्यास त्यांनी अपीलकर्ता व आयोगास तसे कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.४१५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जर्नादन गुलाबराव मून<br>केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,<br>७९१, नागसेनवन, नागपूर - १७ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था (दुग्ध),<br>C/o, जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी भंडारा<br>वरठी रोड, आय.टी.आय. कॉलेज जवळ, भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा सचिव<br>गुलशन कुक्कुटपालन सहकारी संस्था, खरबी<br>पो. ठाणा ता.जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ६५८/नाग /२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | सचिव, (जनमाहिती अधिकारी)<br>गुलशन कुक्कुटपालन सहकारी संस्था, खरबी<br>र.नं.१०२, पो. ठाणा, ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ५. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध)<br>जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०५/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपील क्र.४१५/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. १६/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८/०४/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/०५/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता श्री जर्नादन गुलाबराव मून व प्रथम अपीलीय अधिकारी

तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. आर.एस.काळे हे उपस्थित आहेत. अपील क्र. ६५८/नाग /२०१० दि. ११/०५/२०१० रोजी दाखल करण्यात आले. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.२८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दि.१८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सचिव, (जनमाहिती अधिकारी) गुलशन कुक्कुटपालन सहकारी संस्था, खरबी हे गैरहजर आहेत. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) हजर आहेत.

२. अपील क्र.४१५/नाग/२०१० मध्ये श्री जनार्दन गुलाबराव मून यांनी जनमाहिती अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी भंडारा यांचेकडे गुलशन कुक्कुटपालन सहकारी संस्था, मर्या. खरबी या संस्थेविषयी खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. संस्थेचे सर्वसाधारण सदस्यांची पत्त्यासह यादी.

२. कार्यकारी मंडळाची पत्त्यासह यादी.

३. सन २००८-२००९ च्या वार्षिक आमसभेची संपूर्ण माहितीची सत्यप्रत.

४. एप्रिल २००९ पासून आजपर्यंतच्या मासीक सभेचा इतिवृत्तांतची सत्यप्रत.

५. एन.सी.डी.सी. कडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण माहिती.

६. आजपर्यंत संस्थेवर असलेल्या कर्जाची थकबाकी व त्यावरील व्याज

७. कर्ज परतीचा भरणा केला असल्यास त्याची संपूर्ण माहिती.

८. संस्थेला किती पक्षांचा प्रकल्प मंजूर झाला आहे त्याची सत्यप्रत.

९. एप्रिल २००६ पासून आजपर्यंतच्या FLOCK RECORD ची झेरॉक्स सत्यप्रत.

१०. एप्रिल २००६ पासूनची आजपर्यंत पक्षी संख्या दररोज अंडी उत्पादन, अंडी विकल्याचा दर व एकूण जमा रक्कम या संबंधीची संपूर्ण माहिती देण्याची तसदी घ्यावी.

११. एप्रिल २००६ पासून आजपर्यंतच्या ऑडिट रिपोर्ट ची प्रत.

अशाप्रकारे त्यांना एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) भंडारा यांनी दि.०१/०१/२०१० रोजी मुद्या क्र. १ व २ ची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध असून दस्तऐवज पुरविण्यासाठी रुपये ६/- व टपाल खर्च रुपये २५/- असे एकूण रुपये ३१/- चे या कार्यालयात भरणा केल्यास उपरोक्त नमूद केलेली माहिती आपणास पुरविण्यात येईल, मुद्या क्र.३ ते ११ ची माहिती संस्था स्तरावर असल्याने संस्थेचे जनमाहिती अधिकाऱ्यांकडे संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. असे कळवून संबंधित अर्ज संस्थेकडे पाठविलेला आहे असे दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १०/०२/२०१० रोजी प्रथम अपील हे सहाय्यक उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १२/०३/२०१० रोजी देण्यात आलेला असून अपील मंजूर करण्यात आले आहे. गैरअपीलार्थीने म्हणजेच संस्थेने अपीलार्थीना त्यांच्या अर्जानुसार मुद्या क्र. ३ ते १० ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. असा आदेश दिला आहे. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतू वरील जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

**<u>अपील क्र. ६५८/नाग/२०१०</u>**

४. अपील क्र. ६५८/नाग/२०१० व अपील क्र.४१५/नाग/२०१० या दोनही अपीलांची सुनावणी आज ठेवण्यात आली. परंतू जनमाहिती अधिकारी व संस्थेचे सचिव हे आज गैरहजर आहेत व अपीलार्थी हे हजर आहेत. त्यांनी त्यांच्या वकीलांच्या मार्फत त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडले आहे.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, गुलशन कुक्कुटपालन सहकारी संस्थेस केंद्र शासनाकडून कर्ज मिळते व हे कर्ज अर्थातच सार्वजनिक निधी मधूनच उपलब्ध होते म्हणजेच हा सार्वजनिक निधी आहे व त्यामुळे अशा प्रकारे मिळालेला निधी सार्वजनिक निधीच्या संदर्भात योग्य रितीने त्याचा विनियोग होतो किंवा नाही याबद्यल अपीलकर्ता यांनी सहाय्यक निबंधक यांचेकडे माहिती मागितलेली होती. सहाय्यक निबंधक यांच्याकडे असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र मुद्या क्र ३ ते ११ ची माहिती ही संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले व संस्थेस सुध्दा आदेश दिला. तरीही संस्थेने माहिती तर दिली नाहीच उलटपक्षी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा संस्थेस लागू होत नाही असे

सहाय्यक निबंधक यांना कळविले. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द द्वितीय अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदर संस्थेस महाराष्ट्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना DIC कडून रुपये २५ लाखांची सबसिडी मिळते परंतू अद्यापही त्यांनी ही माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिली नाही. संस्थे तर्फे जे अपील दाखल करण्यात आले आहे त्या अपील मेमोमध्ये संस्था ही सहकारी संस्था असल्याने त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही, हा मुद्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारात घेतला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यात यावे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा हा निर्णय रद्य करण्यात यावा अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी सुध्दा याचिका क्र. ५६६/२००८ मध्ये सहकारी संस्थाना शासनाचे अनुदान नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीं लागू होत नाहीत व सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही. असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपील क्र.४१५/नाग/२०१० हे फेटाळण्यात येत आहे व अपील क्र.६५८/नाग/२०१० हे मंजूर करण्यास पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि.१२/०३/२०१० चा निर्णय रद्य करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपील क्र.४१५/२०१० हे निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्र.६५८/२०१० हे मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि.१२/०३/२०१० चा निर्णय हा रद्य करण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंर्तगत अपील.**

**<u>अपील क्र.६५६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दौलतराव तिमाजी मेंढुले,<br>मु. सालेभट्टी (दंदे) महालगाव, ता. भिवापुर, जिल्हा नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>गट- अ जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांच्या तर्फे समाज कल्याण अधिकारी श्री सुरेन्द्र पवार हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २२/०८/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे गट - अ, श्री संत नानाजी महाराज विद्या प्रसारक मंडळ हिंगणघाट, जि. वर्धा या संस्था कार्यकारणी मंडळाची एकुण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने किंवा शिपाईद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.११/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. विहित मुदतीत प्रथम अपील दाखल केले नसल्यामुळे प्रथम

अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता गैरहजर आहेत व त्यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये माहिती उपलब्ध झालेली नाही याबद्यलची जी कारणे दिलेली आहेत ती संयुक्तिक नाहीत. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज दि.२२/०८/२००८ रोजी दाखल केल्यानंतर अधिनियमाचे तरतुदींप्रमणे कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता जिल्हा समाज कल्याण अधिकारी नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर, आयुक्त अपंग कल्याण विभाग पूणे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, प्रधान सचिव सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई, सहाय्यक धर्मदाय आयुक्त वर्धा, मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे अर्ज विनंत्या केलेल्या दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची माहिती मिळविण्यासाठी आधार घेतल्यानंतर अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही तर ३० दिवसांचे आत माहिती मिळविण्याकरीता प्रथम अपील दाखल करावे लागते. व ते त्यांनी दि. ११/०२/२०१० रोजी जवळ-जवळ १६ महिन्यांनी दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर ९० दिवसांमध्ये द्वितीय अपील दाखल करावे लागते. प्रामुख्याने या अपीलात प्रथम अपीलाचा निर्णयच नाही. त्यामुळे द्वितीय अपील हे नियमांप्रमाणे निर्णय देता येत नाही व त्यात विलंबाचे सुध्दा त्यांनी कोणतेही कारण दिलेले नाही. माहिती अधिकाराचा कायदा जरी केला तरी अपीलकर्ता हे त्यांच्या मनाला येईल त्याप्रमाणे अर्ज फाटे करीत असतात असे दिसते. आयोगाकडे सुध्दा त्यांनी दि. १०/०१/२००९ रोजी तक्रार केली होती तक्रारीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना ४ पत्रे दिली तरी ते माहिती घेण्यास येत नाहीत असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. त्यामुळे सदरची तक्रार सुध्दा खारीज करण्यात आली होती. आजसुध्दा अपीलकर्ता हे आयोगाचे कार्यालयात सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. आयोगाचे कार्यालयातून नोटीस गेल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना पुन्हा पत्र दिलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचा कोणताही प्रतिसाद हा जनमाहिती अधिकारी यांना मिळाला नाही. मात्र त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आज अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे संबंध नाही. व त्यांना त्या नियमांमध्ये सुध्दा अधिकार नाही. वरील अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन वेळेचा अपव्यय अपीलकर्तानेे केलेला आहे. पुन्हा

तांत्रीक मदत जरी बाजूला ठेवली तरी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अपंग संस्थेची आहे. संस्था जर अनुदानीत आहे तर ते सार्वजनिक प्राधिकरणात येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेतील माहिती अधिकारी यांना माहिती मागणे व नंतर प्रथम अपील व द्वितीय अपीलाची प्रक्रिया करणे आवश्यक होती परंतू त्यांनी तसेही केले नाही. समाज कल्याण अधिकारी यांचेकडे ४ मुद्यांची माहिती उपलब्ध आहे. ती अपीलकर्ता यांना द्यावयाची असून आज ती त्यांचेकडे पाठविवण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. परंतू मुद्या क्र.५ पासूनची माहिती ही संस्था स्तरावरची आहे व त्यामुळे ती संस्था स्तरावर मागणे आवश्यक आहे.

४. अपीलकर्ता यांची एक तक्रार अशी दिसून येते की, त्यांनी जी सर्व काही माहिती मागितलेली आहे ती त्यांना कोणीही देत नाही परंतू ती कोणत्याही एका कार्यालयाकडे मागितलेली आहे असे दिसून येत नाही. कायदा हा जसा सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना लागू आहे तसा तो अपीलकर्ता व अर्जदाराला सुध्दा लागू आहे. ज्या कार्यालयातील तक्रार असते त्या कार्यालयात गेल्याशिवाय तक्रार करण्यास काहीही अर्थ राहत नाही.

आयोगापुढील अपील हे वर नमूद केल्याप्रमाणे दाखल सुध्दा करुन घेण्याची आवश्यकता नव्हती. परंतू माहिती मिळणे हा महत्तवाचा उद्येश असल्यामुळे हे दाखल करुन घेण्यात आले आहे. परंतू संस्थेत माहिती अधिकारी हे पक्षकार नसल्यामुळे आयोगास माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश देता येत नाही. मात्र समाज कल्याण अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतंगत अपील.**

**<u>अपील क्र.६६१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दौलतराव तिमाजी मेंढुले,<br>मु. सालेभट्‌टी (दंदे) महालगाव, ता. भिवापुर, जिल्हा नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>गट- अ जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०१० रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांच्या तर्फे समाज कल्याण अधिकारी श्री सुरेन्द्र पवार हे उपस्थित आहेत.

**<u>आदेश</u>**

३. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६५६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दौलतराव तिमाजी मेंढुले,<br>मु. सालेभट्टी (दंदे) महालगाव, ता. भिवापूर, जिल्हा नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>गट-अ जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांच्या तर्फे समाज कल्याण अधिकारी श्री सुरेन्द्र पवार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.२२/०८/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद गट- अ नागपूर यांचेकडे श्री संत नानाजी महाराज विद्या प्रसारक मंडळ हिंगणघाट, जि. वर्धा या संस्थेकडून चालविण्यात येत असलेले अपंग औद्योगिक प्रशिक्षण केन्द्र संबंधी एकूण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती मार्च २००६ ते ऑगष्ट २००८ या कालावधीतील मागितलेली असून ती टपालाने किंवा शिपाईद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.११/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. विहित मुदतीत प्रथम अपील दाखल केले नसल्यामुळे प्रथम

अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता गैरहजर आहेत व त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झालेली नाही याबद्यलची जी कारणे दिलेली आहेत ती संयुक्तिक नाहीत. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज दि.२२/०८/२००८ रोजी दाखल केल्यानंतर अधिनियमाचे तरतुदींप्रमाणे कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता जिल्हा समाज कल्याण अधिकारी नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर, आयुक्त अपंग कल्याण विभाग पूणे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, प्रधान सचिव सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई, सहाय्यक धर्मदाय आयुक्त वर्धा, मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे अर्ज विनंत्या केलेल्या दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची माहिती मिळविण्यासाठी आधार घेतल्यानंतर अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही तर ३० दिवसांचे आत माहिती मिळविण्याकरीता प्रथम अपील दाखल करावे लागते. व ते त्यांनी दि. ११/०२/२०१० रोजी जवळ-जवळ १६ महिन्यांनी दाखल केले आहे. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर ९० दिवसांमध्ये द्वितीय अपील दाखल करावे लागते. प्रामुख्याने या अपीलात प्रथम अपीलाचा निर्णयच नाही. त्यामुळे द्वितीय अपील हे नियमांप्रमाणे निर्णय देता येत नाही व त्यात विलंबाचे सुध्दा त्यांनी कोणतेही कारण दिलेले नाही. माहिती अधिकाराचा कायदा जरी केला तरी अपीलकर्ता हे त्यांच्या मनाला येईल त्याप्रमाणे अर्ज फाटे करीत असतात असे दिसते. आयोगाकडे सुध्दा त्यांनी दि.१०/०१/२००९ रोजी तक्रार केली होती. तक्रारीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना ४ पत्रे दिली तरी ते माहिती घेण्यास येत नाहीत असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. त्यामुळे सदरची तक्रार सुध्दा खारीज करण्यात आली होती. आजसुध्दा अपीलकर्ता हे आयोगाचे कार्यालयात सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. आयोगाचे कार्यालयातून नोटीस गेल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना पुन्हा पत्र दिलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचा कोणताही प्रतिसाद हा जनमाहिती अधिकारी यांना मिळाला नाही. मात्र त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आज अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे संबंध नाही. व त्यांना त्या नियमांमध्ये अधिकार सुध्दा नाही. वरील अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन वेळेचा अपवय्य अपीकर्ताने केलेला आहे. पुन्हा

तांत्रिक मदत जरी बाजूला ठेवली तरी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अपंग संस्थेची आहे. संस्था जर अनुदानित आहे तर ते सार्वजनिक प्राधिकरणात येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेतील माहिती अधिकारी यांना माहिती मागणे व नंतर प्रथम अपील व द्वितीय अपीलाची प्रक्रिया करणे आवश्यक होते. परंतू त्यांनी तसेही केले नाही. समाज कल्याण अधिकारी यांचेकडे ४ मुद्यांची माहिती उपलब्ध आहे. ती अपीलकर्ता यांना द्यावयाची असून आज ती त्यांचेकडे पाठविण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. परंतू मुद्या क्र. ५ पासूनची माहिती ही संस्था स्तरावरची आहे व त्यामुळे ती संस्था स्तरावर मागणे आवश्यक आहे.

४. अपीलकर्ता यांची एक तक्रार अशी दिसून येते की, त्यांनी जी सर्व काही माहिती मागितलेली आहे ती त्यांना कोणीही देत नाही परंतू ती कोणत्याही एका कार्यालयाकडे मागितलेली आहे असे दिसून येत नाही. कायदा हा जसा सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना लागू आहे तसा तो अपीलकर्ता व अर्जदाराला सुध्दा लागू आहे. ज्या कार्यालयातील तक्रार असते त्या कार्यालयात गेल्याशिवाय तक्रार करण्यास काहीही अर्थ राहत नाही.

आयोगापुढील अपील हे वर नमूद केल्याप्रमाणे दाखल सुध्दा करुन घेण्याची आवश्यकता नव्हती. परंतू माहिती मिळणे हा महत्वाचा उद्येश असल्यामुळे हे अपील दाखल करुन घेण्यात आले आहे. परंतू संस्थेत माहिती अधिकारी हे पक्षकार नसल्यामुळे आयोगास माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश देता येत नाही. मात्र समाज कल्याण अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६६१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भास्कर विठ्ठल वाघमारे<br>एल.आय.जी. ८/१, वकीलपेठ, रेशीमबाग चौक, नागपूर<br>ता.जि. नागपूर - ४४० ००९ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी<br>जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, नागपूर<br>प्रशासकीय इमारत क्र.२, सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सदस्य सचिव<br>जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, नागपूर<br>प्रशासकीय इमारत क्र.२, सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २३/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३, नागपूर यांचेकडे अर्ज सादर केला समितीने त्यांचा जात पडताळणी अर्ज स्विकारला नाही अशी त्यांची तक्रार दिसून येते. याबाबत त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे सुध्दा जोडलेली आहेत.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि.१८/०१/२०१० रोजी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने प्रस्तावातील त्रुटी अपीलकर्ता यांना कळविलेल्या आहेत. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. २७/०१/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २२/०२/२०१० रोजी देण्यात आलेला दिसतो. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व केलेला खुलासाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जाती वैधता प्रमाणपत्र समितीच्या निर्णयाशी संबंधीत आहे. सदर माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अपीलार्थीचे अपील हे फेटाळण्यात आले आहे असे दिसून येते. परंतू या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६६०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री हेमंत दादुरामजी टेटे<br>प्लॉट क्र.३५, स्वराज नगर, पोस्ट - पार्वतीनगर,<br>मानेवाडा रिंग रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०२७ | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्यूरो, नागपूर<br>प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सदस्य सचिव<br>ॲन्टी करप्शन ब्यूरो, नागपूर<br>प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्रीमती शुभा झिंझर्डे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी अप्पर पोलीस अधिकारी यांचे ॲन्टी करप्शन ब्यूरो या कार्यालयास दि. ०१/०१/२००९ ते दि. २८/०२/२००९ या कालावधीत माझे विरुध्द आपणाकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीविषयी एकूण ५ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. दि.०१/०१/२००९ ते दि. २८/०२/२००९ या कालावधीत माझ्याविरुध्द किती तक्रारी दाखल करण्यात आल्या, प्रत्येक तक्रारीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

२. दि.०१/०१/२००९ ते दि. २८/०२/२००९ या कालावधीत माझ्याविरुध्द कितीदा सापळा रचण्यात आला व कोणकोणत्या तारखेला, तक्रारकर्त्याची नांवे देण्यात यावी.

३. दि.०१/०१/२००९ ते दि. २८/०२/२००९ या कालावधीत रचण्यात आलेला सापळा कितीदा व कोणकोणत्या तारखेला अयशस्वी झाला त्याचे कारण काय ?

४. अयशस्वी सापळयाची पुढे चौकशी करण्यात आली काय ? करण्यात आली असल्यास चौकशी अहवालाची प्रत देण्यात यावी.

५. तक्रारकर्त्यांनी केलेल्या तक्रारींची सत्यता आपणातर्फे प्रमाणित करण्यात येते काय ?

इ. माहिती टपालाने घेणार असल्याने अपीलकर्ता हे टपालखर्च भरण्यास तयार आहेत असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०६/०२/२०१० रोजी मुद्या क्र. १, २, ३, ४ ची प्रमाणित माहिती आपणास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (जी) अन्वये देणे अधिकृत नसल्यामुळे फेटाळण्यात येत आहे. मुद्या क्र. ५ मध्ये तक्रारकर्त्याने केलेल्या तक्रारीची प्राथमिक पडताळणी या विभागातर्फे केली जाते असे त्यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०१० रोजी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मुद्या क्र. १ ते ४ नुसार मागितलेली माहिती नमूद केल्याने तक्रारकर्त्याचे जिवन व शारिरिक सुरक्षितता धोक्यात येईल आणि गुप्त स्वरुपात दिलेल्या माहितीचे स्त्रोत अर्जदारास कळेल त्यामुळे ती माहिती कलम ८ (छ) अन्वये देणे बंधनकारक नसल्याने ही माहिती अर्जदारास देता येत नाही असे सुनावणी दरम्यान स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती व घेतलेला निर्णय योग्य आहे असे ठरवून अपीलकर्त्यास कळविण्यात आले. सदरचा निर्णय अपीलकर्ता यांनी सुध्दा सुनावणी दरम्यान मान्य केला. परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. शुभा झिंझर्डे यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांचे स्वतःच्या विरुध्द किती तक्रारी दाखल झालेल्या आहेत त्या तक्रारकर्त्यांची नांवे व कितीवेळा सापळा रचण्यात आला इ. माहिती मागितलेली आहे. तक्रारदाराला हे कळणे आवश्यक आहे की, त्यांचेविरुध्द कोण तक्रारी करीत आहेत, कटकारस्थान करीत असून त्यांना अडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत, तक्रारीनुसार अपेक्षित कार्यवाही पूर्ण झालेली नसेल तर तक्रारदारास शासनाकडून वारंवार त्रास देण्याच्या कारणास्तव

चौकशी होणे जरुरी आहे. परंतू सदरची माहिती त्यांना नाकारण्यात आलेली आहे. पुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, तक्रारदाराच्या जिवितास धोक्याच्या संभवतेने त्यांच्या सुरक्षिततेची काळजी ही घेतली जात आहे परंतू त्याला त्या तक्रारींमुळे वारंवार त्रास होत आहे व तक्रारकर्त्याची नांवे दिली जात नाही हे योग्य नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ॲन्टी करप्शन ब्यूरो यांचेकडे तक्रार आल्यावर त्याची पडताळणी केली जाते व पडताळणी केल्यावर जी कार्यवाही केली जाते त्या कार्यवाही मध्ये संबंधीत व्यक्ती सापडल्यास त्यांचेविरुध्द चौकशी होवून गुन्हा दाखल करुन न्यायालयात आरोपपत्र दाखल केले जाते. तक्रारीत तथ्य नसेल तर संबंधीत व्यक्तींसाठी कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही व त्यामुळे तक्रारकर्त्याची नांवे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही आणि ती नावे गुप्त ठेवणेही आवश्यक असल्याने अधिनियमाचे कलम ८ (छ) प्रमाणे ती उपलब्ध करुन देता येत नाही अशी माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. अपीलकर्ता हा विश्वासपूर्वक तक्रार देत असतो. व त्यामुळेच तक्रारकर्त्याची नांवे ही उपलब्ध करणे हे अधिनियमाचे कलम ८ (छ) मध्ये येत असल्यामुळे त्यांना कळविण्यात आले. त्यामुळे त्यांनी अपीलकर्ता व त्यांचे वकील यांनी त्यांचेविरुध्द कमीतकमी किती तक्रारी आल्या आहेत त्या तक्रारींची संख्या देण्याचा आदेश आयोगाने करावा अशी विनंती केली आहे. परंतु त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे जी तक्रार आली होती त्या तक्रारीप्रमाणे जी कार्यवाही झाली त्या कार्यवाही मध्ये अर्जदार यांचेविरुध्द चौकशी होवून आरोपपत्र सादर झाले. अपीलकर्ता यांनी त्यांचे दि. ०२/०२/२०१० च्या अर्जाचेवेळी चौकशी सुरु असल्यामुळे कार्यवाही करता येत नाही व झालेल्या गुन्हयामध्ये सुध्दा माहिती प्रकट करणे आवश्यक नव्हते असे सर्वसाधारण उत्तर त्यांना देण्यात आले होते. त्या बाबतची माहिती ही त्यांना आरोपपत्रामधूनच मिळेल असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. ०१/०१/२००९ ते २८/०२/२००९ या कालावधीत त्यांचेविरुध्द किती तक्रारी होत्या त्या तक्रारींची संख्या देणे संयुक्तिक राहील. तक्रारकर्त्यांची नांवे प्रकट करणे आवश्यक नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांना त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात किती तक्रारी दाखल करण्यात आल्या याबाबतची संख्या उपलब्ध करण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६११/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पांडुरंग गणपतजी गाढवे<br>रेल्वे स्टेशन रोड, तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार<br>तहसील कार्यालय तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.२८/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तहसील कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया यांचेकडे ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजने संदर्भात, १) ज्यांनी अंदाजे दीड ते २ वर्षापूर्वी अर्ज केलेत त्यांचे अर्ज अद्याप मंजूर झालेले नाहीत. २) नवरा बायको दोघांनाही पेन्शन दिली जात नाही काय? ३) बी.पी.एल. असणाऱ्यांना मिळकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे काय ? या नियमांची प्रत देण्यात यावी. अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि.०९/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यात अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०८/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०७/०६/२०१० रोजी देण्यात आलेला असून त्यांना या प्रकरणातील मंजूर यादी, नामंजूर यादी वगैरे उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना मंजूर, नामंजूर यादीच्या संदर्भामध्ये झ ाालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांना त्याबाबतची कागदपत्रे ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत मंजूर, नामंजूर अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६३२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुनील शामरावती गोरले,<br>द्वारा श्री अविनाश चौधरी,<br>कमरुद्दिन ले आऊट, गोरेवाडा रोड,<br>बोरगाव, नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी (अ शाखा)<br>विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई ३२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, (अ शाखा)<br>विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई ३२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २७/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे दुग्ध विकास विभागात रोजंदारीवर काम करणाऱ्या लोकांना कामावर नियमित करण्याच्या प्रस्तावावरील विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाबाबतची माहिती व सोबत एकूण ८ मुद्यांवर विधी व न्याय विभागाने ज्या कागदपत्रांच्या आधारे अभिप्राय दिलेला आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मुद्येनिहाय मागितलेल्या आहेत. सदरची माहिती अतिशिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि.१८/१२/२००९ रोजी विधि व न्याय विभागाचे अभिमत हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या

निर्णयाच्या अनुषंगाने दिले आहे. तथापी आपण मागितलेली माहिती ही उपरोक्त नमूद अधिनियमाचे कलम २ (फ) नुसार "माहिती" च्या व्याख्येत येत नसल्यामुळे आपला अर्ज नाकारण्यात / निकाली काढण्यात येत आहे असे कळविले आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि.१८/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ११/०२/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निष्कर्ष कायम करण्यात आला आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या दुग्ध विकास विभागाच्या रोजंदारी कामगारांपैकी काही कामगारांना नियमित करण्यात आले आहे. व काही कामगारांना नियमित करण्यात आले नाही. अशाप्रकारचे विधी व न्याय विभागाने अभिमत दिलेले आहे. ते कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दिले आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या. परंतू विधी व न्याय विभागाने माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतेही आकलन न करता अधिनियमाचे कलम २ (फ) च्या व्याख्येत येत नाही असे उत्तर दिले आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विधी व न्याय विभाग, प्रशासकिय विभागाकडून नस्ती पाठविली जाते व त्यात कोणत्या मुद्यांवर अभिमत हवे आहे ते निश्चित करुन मुद्दे उपस्थित करुन अभिप्राय मागितले जातात व त्यातील नस्तीमध्ये जी कागदपत्रे असतात त्या कागदपत्रांच्या आधारावर विधी व न्याय विभागात अभिमत दिले जाते.

वास्तविक जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे जी कार्यपध्दती सादर केली त्या कार्यपध्दती प्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचा अधिनियमाचे कलम ६ (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठी केलेला विनंती अर्ज हा फेटाळून लावण्यापेक्षा त्यांचे अपील हे फेटाळण्यासंबंधी प्रशासकिय विभागास हस्तांतरीत करुन त्या संबंधातील नस्तीच्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात असे कळविणे संयुक्तिक झाले असते. परंतू तसे न करता माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निरर्थक असे उत्तर व निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सदरचा माहितीचा अर्ज दि. २७/११/२००९ हा कृषी व पदुम विभाग / पदुम-९ ला हस्तांतरीत करुन संबंधीत

नस्तीतील दस्तऐवजाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यास कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी कृषी व पदुम विभाग पदुम-९ यांचेकडील संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि.२७/११/२००९ चा अर्ज जोडपत्रांसहीत हस्तांतर करावा व राज्य माहिती आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे सुध्दा त्यात कळविण्यात यावे. सोबत निर्णयाची प्रत देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील. अपील क्र. ६३४/नाग/२०१०अपील क्र. ६३५/नाग/२०१० अपील क्र. ६३७/नाग/२०१० अपील क्र. ६५९/नाग/२०१० अपील क्र. ६९९/नाग/२०१० अपील क्र. ८०३/नाग/२०१०**

१. श्रीमती रुपा बाबुलाल बनोदे, - **अपीलकर्ती**
हनुमान मंदीराजवळ, धरमपेठ
नागपूर - १०

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी
ता. हिंगणघाट जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

४. श्री गोपालकृष्ण मारोतराव बुरडे, - **अपीलकर्ता**
हिरुळकर ज्वेलर्स यांच्या घरामागे ओगले रोड,
चिटणीस पार्क, महाल नागपूर - ३२

**विरुध्द**

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

६. जनमाहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | श्रीमती रुपा बाबुलाल बनोदे,<br>हनुमान मंदीराजवळ, धरमपेठ<br>नागपूर - १० | - | **अपीलकर्ती** |

**<u>विरुध्द</u>**

८. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक,
नागपूर विभाग नागपूर

९. जनमाहिती अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक,
नागपूर विभाग नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | श्री, सुनिल वासुदेवराव भोयर<br>C/o, एस.पी. जामदार, प्लॉट नं.१०, श्री गुरादेवनगर, नंदनवन नागपूर<br>ता जि. नागपूर -४४० ००९ | - | **अपीलकर्ता** |

**<u>विरुध्द</u>**

११. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी,
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

१२. जनमाहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | श्रीमती रुपा बाबुलाल बनोदे,<br>हनुमान मंदीराजवळ, धरमपेठ<br>नागपूर - १० | - | **अपीलकर्ती** |

१४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी,
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

१५. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपील क्र. ६३४/नाग/२०१०, अपील क्र. ६३५/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. ११/०५/२०१० व दि. १२/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ती हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. ६३७/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता श्री गोपालकृष्ण मारोतराव बुरडे यांनी दिनांक ११/०५/२०१० रोजी आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले. त्यांना आयोगाचे कार्यालयातून दि. २०/०५/२०१० रोजी नोटीस काढून दि.१६/०६/२०१० रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरीता कळविण्यात आले. त्यांचे वतीने श्री पांडुरंग कारुजी तितरमारे यांना हजर राहण्यास परवानगी देण्याचा अर्ज केला त्यानुसार श्री तितरमारे हजर आहेत. व उत्तरवादी हजर आहेत. तसेच ६५९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्तीला आयोगाच्या कार्यालयातून दि. २८/०६/२०१० रोजी नोटीस काढून दि. १६/०६/२०१० रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्ती हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. ६९९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. २८/०५/२०१० रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दि. २८/०६/२०१० रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले त्यानुसार अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. ८०३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ती यांनी आयोगाकडे दि. २९/०५/२०१० मध्ये अपील दाखल केले. आयोगाच्या कार्यालयातून दि. ०९/०६/२०१० रोजी नोटीस काढून दि. ३०/०६/२०१० रोजी सुनावणी साठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी हिंगणघाट यांचेकडे अपील क्र. ६३४/नाग/२०१०, व अपील क्र. ६५९/नाग/२०१० दि. ४/०१/२०१० रोजी, अपील क्र. ६३५/नाग/२०१०, दिनांक ०७/०२/२०१० रोजी अपील क्र. ६३७/नाग/२०१० व अपील क्र. ६९९/नाग/२०१० दिनांक १३/०२/२०१० रोजी व अपील क्र. ८०३/नाग/२०१०, दिनांक ०४/०३/२०१० रोजी दाखल केले.

३. अपील क्र. ६३४/नाग/२०१० व अपील क्र.६५९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ती यांनी दि. ०४/०१/२०१० रोजी माहिती अधिकारी, विभागीय कृषी अधिकारी सहसंचालक नागपूर यांचेकडे, तालुका कृषी अधिकारी हिंगणघाट यांना माहे जून २००३ मध्ये श्री पी. के. तितरमारे मंडल कृषी अधिकारी हिंगणघाट यांनी सादर केल्याप्रमाणे खाली नमूद केलेल्या दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती मागितलेल्या दिसतात.

१. मापन पुस्तिका क्र.००२९ व ००३५ दोनही गटांचे शेततळे छायांकित प्रमाणीत प्रती यामध्ये नोंदी

केलेल्या पगार पत्राचे क्र.५२१८ ची छायांकित प्रत.

२. मापन पुस्तक क्र ००२९ मध्ये पगार पत्रक क्रमांक ५२१५ ची छायांकित प्रत.

३. श्री कवडू दशरथ वासेकर यांची संत्रा लागवड १.०० हेक्टर.

४. राजपाल न जरोंदे यांचे अंदाजपत्रकाचे संपूर्ण दस्तऐवजाचे छायांकित प्रमाणित प्रती.

५. सेंद्रीय शेतीचे अर्ज सहपत्र फ.

सदर दोनही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०२/०२/२०१० रोजी उत्तर दिलेले आहे परंतू त्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी अपील क्र. ६३४/२०१० मध्ये दि. २२/०२/२०१० व अपील क्र. ६५९/२०१० मध्ये दि. १८/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. कृषी सह संचालक यांचेकडे जो अर्ज दाखल केलेला आहे तो तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे हस्तांतरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपील सुध्दा हस्तांतर करण्यात आले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांना यापूर्वी सुध्दा माहिती मागितली होती परंतू ती माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिली नाही. श्री पी. के. तितरमारे बडतर्फ कृषी पर्यवेक्षक यांचेबाबत तालुका कृषी अधिकारी हिंगणघाट यांचे कार्यालयातील सादर केलेल्या अभिलेखाच्या सत्यप्रतींची मागणी केल्यावर त्या कार्यालयाने माहितीच्या अधिकारांतर्गत मागणी केलेला कार्यालयीन संपूर्ण अभिलेख श्री तितरमारे हे स्वतःजवळ बाळगून असून केवळ मुखपत्र त्यांनी देवून अभिलेख दिल्याबाबत भास निर्माण करुन प्रशासनाची दिशाभूल केली आहे असे दिसते. यापूर्वी माहिती अधिकाराचे सुनावणीचे वेळी विभागीय चौकशी दरम्यान ही बाब सिध्द झालेली आहे असे कळविले आहे. परंतू त्याबाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या सुनावणीचे वेळी अपीलकर्ता हे हजर झाले नाही. म्हणून प्रथम अपीलात जो निर्णय देण्यात आलेला आहे त्यात अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांना सुनावणीच्या तारखेनंतर २ आदेश मिळाले. अशाप्रकारे पूर्वसूचना न देता सुनावणी ठेवली जाते व माहिती देण्याची टाळाटाळ करण्याचा उद्येश ठेवून अशाप्रकारचे पत्र दिले जाते की, अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाही.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री पांडुरंग कारुजी तितरमारे यांचे अंतर्गत ही माहिती मागितली जाते त्यांचे अपील क्र. ८१/२००७ च्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला आहे. त्यातही त्या वेळेस श्री तितरमारे यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु होती. व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मध्ये श्रीयुत तितरमारे यांचेविरुध्दचे प्रकरण न्याय प्रविष्ट होते परंतू विभागीय चौकशी संपलेली असेल किंवा न्याय प्रविष्ट प्रकरणी निकाल लागलेला असल्यास त्याबाबत माहिती देण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नाही अशाप्रकारचे निरिक्षण राज्य माहिती आयोगाने केले होते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, विभागीय चौकशी झाली आहे. परंतू त्यामधेच श्रीयुत तितरमारे यांनी संपूर्ण कागदपत्रे जमा केलेली नाही हे सिध्द झाले असल्याचे त्यांना कळविण्यात आले होते. परंतू अपीलकर्ता यांचे तर्फे श्री तितरमारे स्वतः हजर आहेत व त्यांनी असे सांगितले की, कागदपत्रे व पगार पत्रक जमा केल्याचे त्यांचेजवळ पुरावा आहे. व त्याबाबत त्यांना त्यावेळी माहिती मागितली होती परंतू त्यांचेजवळ जर तसा पुरावा असेल तर त्यांनी तो विभागीय चौकशीमध्ये किंवा प्रशासकिय न्यायाधिकरणाकडे सादर करणे आवश्यक होते. माहितीच्या अधिकारात माहिती मागण्याची आवश्यकता नव्हती. यावरुन

अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांच्या दोनही बाजू  विसंगत असल्यामुळे सदर प्रकरणामध्ये कृषी सहसंचालक यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये (कागदपत्रे        उ पलब्ध आहेत किंवा नाहीत) अधिनियमाचे कलम १९ (८) अन्वये तसेच अधिनियमाचे कलम १८ (२) प्रमाणे चौकशीचा आदेश देण्याच्या अधिकारान्वये कृषी सहसंचालक यांनी प्रथम अपीलीय अधिकारी वगळून सक्षम अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांची अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

अपील क्र. ६३४/नाग/२०१० मध्ये जिल्हा कृषी अधिक्षक यांनी स्वतंत्रपणे निपःक्षपाती चौकशी करावी व आयोगाकडे अहवाल सादर करावा. अपील क्र. ८०३/नाग/२०१०, ६९९/२०१०, ६३७/२०१०, ६३४/२०१०, ६३५/२०१० व ६५९/२०१० मध्ये माहितीचा विषय सारखाच असून अपील क्र. ६३४/२०१०, ६३५/२०१०, व ६५९/२०१० मध्ये दिलेले आदेशांमध्ये इतर अपीलात कायम करण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपीलकर्ता यांची सर्व अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून विभागीय कृषी सह संचालक नागपूर यांनी माहितीची कागदपत्रे उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना पुरविण्याच्या दृष्टिने तसेच विभागीय चौकशी यासंबंधी प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या अधीन राहून चौकशी करुन अहवाल सादर करुन अपीलकर्ता यांना द्यावा व आयोगाकडे सादर करावा.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ६३१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विरेंद्र गजानन दहिकर<br>२३९ चाक्स कॉलोनी, कामठी रोड,<br>नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालय, वैनगंगा नगर अजनी,<br>नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>अधिक्षक व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालय,<br>वैनगंगा नगर अजनी, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालय, यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१) आपल्या कार्यालयामार्फत १५०० रेकार्ड बॅग विकत घेण्यात आले सदर बॅग कोणत्या एजंसी मार्फत घेण्यात आले तसेच कोणत्या विभागात ते पुरविण्यात आले. त्याबाबतचे बॅग मंजुरी पत्रकाची सत्यप्रत तसेच एजंसीचे नांव, एजंसीला देण्यात आलेले देयकांची प्रत व सदर कामाची निविदा ज्या दैनिक वृत्त पत्रात जाहीर करण्यात आले त्या जाहिरातीची सत्यप्रत पुरविणे.

२) आपल्या कार्यालयामार्फत किती बैठक प्लास्टीक खुर्च्या, स्टील अलमारीची खरेदी करण्यात आली व ते कोणकोणत्या विभागाला देण्यात आले. सदर खुर्च्यांचे विक्री कोणत्या एजंसी मार्फत करण्यात आले त्याबाबतची माहिती मुद्येसुद माहिती पुरविणे.

३) Partation (वाटणी) करणे गरजेचे होते काय? जर गरजेचे होते तर ते कसे ? त्या कामाची निविदा कोणत्या दैनिक वृत्तपत्रात देण्यात आली होती. ते काम कोणत्या एजंसीला देण्यात आले होते. त्यांचे बिल किती झाले व ते कसे देण्यात आले याची तपशीलवार मुद्येसुद माहिती पुरविणे.

३. सदर माहिती नोंदणीकृत डाकद्वारे घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि.१९/०३/२०१० च्या पत्राप्रमाणे माहिती विस्तृत व ठोस स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती काढण्यास वेळ लागेल व सुनावणीसही वेळ लागेल त्यामुळे शासकीय कामावर विपरीत परिणाम होईल म्हणून कोणत्याही कामकाजाचे दिवशी पूर्व सुचना देवून आपणास संबंधीत दस्तऐवजांमधून कार्यालयात पाहता येईल. (नियम २ त्र) नुसार ज्या दस्तऐवजांची माहिती मागितलेली आहे त्या दस्तऐवजांपैकी जी माहिती आपणास पाहिजे असेल ती देण्यात येईल व पत्रांच्या प्रती सहाय्यक माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासक व सहाय्यक भांडारपाल लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नागपूर यांना दिलेल्या दिसून येतात. परंतू अपीलकर्ता यांनी दि.१२/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यामध्ये कारण मात्र माहिती न पुरविणे बद्यलचे दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ३१/०५/२०१० रोजी देण्यात आलेला असून अर्जदाराने कार्यालयास पूर्व सुचना देवून संपर्क केल्यानंतर सहाय्यक माहिती अधिक्षक यांनी प्रस्तुत प्रकरणी व्यक्तीगतरित्या लक्ष घालून अर्जदाराला त्याप्रमाणे माहिती दाखवून द्यावी व दस्तऐवजातील निवडक जी माहिती मागितली असेल ती द्यावी व तसे मंडळास अवगत करावे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही अपीलकर्ता यांनी माहिती न पुरविल्याबद्यल राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, ते जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले होते परंतू जनमाहिती अधिकारी यांची भेट झाली नाही. परंतू याबाबत त्यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही. तसेच त्यांचे प्रथम अपील व द्वितीय अपीलामध्ये अशाप्रकारचे कारण दिलेले नाही यावरुन अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात केव्हाही उपस्थित झालेले नाही हे स्पष्ट होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचा कालावधी दिलेला नाही व तो कालावधी दिलेला नसल्यामुळे ती माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती आहे. या संदर्भात कार्यालयात उपस्थित झाल्यास त्यांना कोणत्या कालावधीची माहिती पाहिजे त्याबाबत सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्यात येतील असे जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला असून सुध्दा अपीलकर्ता हे केव्हाही कार्यालयात उपस्थित झाले नाही. परंतू ते कार्यालयात उपस्थित झ ाल्यास त्यांना संपूर्ण अभिलेखे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यांनी आयोगास सांगितले त्याप्रमाणे व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या वेळेत उपस्थित राहून अभिलेखांचे निरिक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**<u>आदेश</u>**

१.	अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

३.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६३३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ॲड वा. सी. गायकवाड,<br>मु.पो. मनसर, ता, रामटेक,<br>नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी उपविभागीय अधिकारी<br>उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, रामटेक<br>जिल्हा नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार<br>तहसील कार्यालय रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.०३/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार रामटेक यांचे कार्यालयात मौजा मनसर येथील सर्व्हे नं. २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १४, १६ इ. शेताची दिवाणी केस नं. ३००/८८ रामटेक कोर्टात सुरु आहे तथापी या नंबरावर अध्यक्ष म्हणून माधवराव भंडारी व तद्नंतर गुंडेराव कायपूरकर यांची नावे चढविण्यात आली, तसेच कोणत्या आधारवर फेरफार करण्यात आले अशा प्रकारची त्यांनी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे असे दिसून येते.

१. फे.फा.क्र.८, १९.१२.९४, फे.फा.क्र.३३, २४.०२.२००४ ला ज्या आधारे घेण्यात आला, त्या संबंधीची कागदपत्रे (नोटीसा दि.०६.०६.९४ च्या निकालाची प्रत इत्यादी)

२. बरेजा पंच कमेटीने नियुक्त केलेल्या अध्यक्षाची या मालमत्तेशी संबंध कसा, या संबंधी माहिती, नावे चढवितांना या संबंधी केलेल्या खात्रीच्या कागदपत्रे. धारक ब्राम्हण, कुणबी,

लोधी इत्यादी असतांना केवळ बारई पंच कमेटीने घेतलेल्या, बरेजा पंच कमेटीने घेतलेल्या निर्णयाच्या प्रति.

३. बरेजा नंबरदाराच्या नेमणूका कशा होतात, या संबंधी माहिती.

४. पट्टीधारक कोण-कोण होते? पट्टीधारक ब्राम्हण, कुणबी, लोधी इत्यादी असतांना केवळ बारई लोकांनी घेतलेला निर्णय वरील प्रापर्टीला बंधनकारक कसा.

३. अपीलकर्ता यांनी दि.०३/०३/२०१० रोजी शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी दि.२०/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१२/०४/२०१० रोजी देण्यात आलेला असून विनामुल्य माहिती द्यावी असा निर्णय झालेला आहे. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. ०३/०३/२०१० रोजी शुल्क भरण्याचे पत्र दिले होते. परंतू अपीलकर्ता यांना ते पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे परंतू जनमाहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध आहे व ती आता सुध्दा सोबत आणली आहे असे आयोगापुढे सांगितले. ती माहिती अपीलकर्ता यांना आयोगासमोर देण्यात आली तसेच अपीलकर्ता यांनी माहितीची पोच दिली. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६४९/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोतीराम पांडुरंग कळंभे,<br>रा. चिकना, ता. कुही.<br>नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती ता. कुही.<br>जिल्हा नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्रामपंचायत चिकना पो. डोंगरमौदा ता. कुही.<br>जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. पी.बी. किरवीते हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/१२/२००९ रोजी सचिव ग्रामपंचायत चिकना पो. डोंगरमौदा ता. कुही जि. नागपूर यांचेकडे श्री इश्वर पांडुरंग कळंबे यांचे नावे घर व खाली जागा कोणत्या दस्तऐवजांप्रमाणे करण्यात आली आहे त्याचा संपूर्ण तपशील अशी माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद करुन माहिती मागितली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०९/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले आहे की,

...२...

त्यांचे कुटुंबाचे संपूर्ण घर, खाली जागा हे अपीलकर्ता यांचे भाऊ श्री ईश्वर पांडुरंग कळंभे फक्त यांचेच नावे करण्यात आली आहे परंतू अपीलकर्ता हे स्वतः सुध्दा वारस असल्याने त्यांचे नावे मात्र करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांनी इश्वर पांडुरंग कळंभे यांचे नावे कोणत्या आधारावर घर व खाली जागा करण्यात आली आहे ही माहिती विचारलेली आहे. परंतू अद्याप पर्यंत अपीलकर्ता यांना ही माहिती देण्यात आलेली नाही. तसेच त्याच गावात राहून सुध्दा याबाबत काहीही माहिती सांगण्यात येत नाही. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे सिध्द होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झालेला आहे किंवा नाही हे कळण्यास मार्ग नाही परंतू अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणीस सुध्दा बोलाविण्यात आले नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या दि.०८/१२/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामुल्य कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांचे दि.०८/१२/२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसांचे आत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी आज हजर राहून माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने त्यांनी माहिती दिली किंवा नाही याबद्यल आयोगापुढे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली असून सुध्दा ते हजर सुध्दा झाले नाही व त्यांनी त्यांचे म्हणणेही मांडले नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००,

इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये खंडविकास अधिकारी, पंचायत समिती कुही यांनी जमा करावयाची आहे.

२. खंडविकास अधिकारी पंचायत समिती कुही यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६४८/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पुंडलीकराव धरममाळी,<br>साई नगर नं. २, प्लॉट नं. ३६/बी, हुडकेश्वर रोड,<br>पो. म्हाळगीनगर नागपूर जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक<br>सामान्य रुग्णालय भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी<br>सामान्य रुग्णालय भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.१८/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी सामान्य रुग्णालय भंडारा यांचेकडे सन १९८९ ते २००० पर्यंत माहिती सोबत जोडलेल्या यादी नुसार उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.अर्जाच्या अनुषंगाने दि. १७/१२/२००९ रोजी अपीलकर्ता यांना १४० पृष्ठांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी पुन्हा ३०/१२/२००९ रोजी माहिती अपूर्ण उपलब्ध करुन दिली म्हणून जनमाहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते या पत्राच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना पुन्हा दि.०९/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतू त्यानंतर पुन्हा माहिती उपलब्ध झ ााली नाही व अप्राप्त आहे म्हणून दि.०८/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे.

या संदर्भामध्ये अपीलकर्ता सुनावणीकरीता हजर झाले नसल्यामुळे अपील प्रकरण नस्तीबध्द करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना आतापर्यंत २०० च्या वर पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. माहिती ही अतिशय जुनी असल्यामुळे व ती रुग्णालयाच्या कार्यालयातील असल्यामुळे ती सर्व माहिती एकत्रित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यामुळे हे जवळ जवळ अशक्यप्राय असल्याने अपीलकर्ता यांना प्रत्यक्षपणे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. माहिती ही जुनी असल्यामुळे व त्या माहितीचा या कार्यालयाशी काहीही संबंध नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न करुन देण्याचा काहीही उद्येश नाही. अपीलकर्ता हे सुध्दा १९८८ मध्ये कोणत्या प्रकारचा भ्रष्टाचार झाला याबद्यलची माहिती तब्बल ३० वर्षांनी मागत आहेत. शक्यतोवर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे, तरीसुध्दा अपीलकर्ता यांना माहिती अपूर्ण आहे असे वाटत असेल तर त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे लेखी, सुटसुटीत व निश्चित अशा कागदपत्रांचे वर्णन करुन माहिती मागणे संयुक्तिक राहील. मिळालेल्या माहितीतून अनुमान काढून माहिती मागता येत नाही. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जी माहिती त्यांना मिळालेली नाही ती माहिती त्यांनी अनुमान काढूनच मागण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अनुमान न काढता निश्चित कागदपत्रांचे वर्णन करुन दिल्यासच माहिती उपलब्ध होवू शकेल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आदेश**

१. अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांना अपेक्षित असलेल्या अभिलेखांचे निश्चित वर्णन करुन (जर तर ची भाषा वगळून) यादी द्यावी. व अशाप्रकारची यादी दिल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदरचे अभिलेखे त्यांचेकडे उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६४६/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुकुंद मंगरुजी लांजेवार,<br>३० जुना सुभेदार ले आऊट विस्तार,<br>मानेवाडा रोड नागपूर - ४४० ०२४ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय मौदा, जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे दुरुस्ती लिपीक श्री क्षिरसागर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.२०/०७/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख मौदा कार्यालय यांचेकडे मौजा गोवरी ता. मौदा येथील भुमापन क्र. ३५० ची पूर्नमोजणी करतांना मूळ आराजी मध्ये झालेली तफावत दुरुस्ती करुन क्षेत्र दुरुस्ती बाबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितली होती परंतू माहिती साध्या टपालाने घेणार असे नमूद केले होते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २८/०७/२००९ रोजी खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भात पत्र देण्यात आले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी एकूण रुपये ८०६/- चा भरणा केला. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. २२/१०/२००९ रोजी माहिती अधिकारी यांना पत्र दिले. व दि. ०३/११/२००९

रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८/०१/२०१० रोजी देण्यात आलेला असून ज्यादा फी च्या संदर्भात दि. २५/०९/२००१ च्या महाराष्ट्र शासन अधिसुचनेचे राजपत्र 'अ' ची प्रत पुरविण्यात आली आहे. माहिती उपलब्ध झाली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. त्यानंतर दि.१९/१/२०१० रोजी पुन्हा फॉर्म नं. ११ ची माहिती दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, दि. २४/०८/२००९ च्या पत्रामध्ये ११ नकाशांची रुपये २२०/- ची आकारणी करण्यात आली आहे परंतू प्रत्यक्षात त्यांना दोनच नकाशे देण्यात आले आहेत. पूर्नमोजणी नंतर सुध्दा जो नकाशा देण्यात आलेला आहे तो एकच नकाशा देण्यात आलेला आहे व जे नियम पुरविण्यात आले आहेत त्या नियमाप्रमाणे भूमापन क्रमांकाच्या नकाशांप्रमाणे रुपये १०/- नसून रुपये ५/- ची आकारणी तरतुदीत आहे. त्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांचेकडून जास्त फी ची आकारणी केली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब यातील नियम व आदेश, महसूल व वन विभाग यांचे दि. २५/०९/२००१ चे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ प्रमाणे आयोगाचे निर्दशनास आणले व त्यामध्ये प्रत्येक भूमापन क्रमांकाच्या नकाशासाठी नागरी विभागाकरीता रुपये १०/- व ग्रामीण विभागाकरीता रुपये ५/- अशी आकारणी केली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या नकाशांमधे ११ भूमापन क्रमांक असलेले दोन नकाशे असल्यामुळे रुपये २२०/- आकारण्यात आले आहेत व पूर्नमोजणी नंतरच्या नकाशाकरीता ११ भूमापन क्रमांक असलेल्या एका नकाशाकरीता रुपये ११०/- आकारण्यात आले आहेत.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, रुपये ५/- प्रमाणे दोन नकाशे तसेच नंतरचा एक नकाशा अशी आकारणी करणे आवश्यक होते. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे जरी खरे असले तरी त्यांचे दि. २४/०८/२००९ चे पत्रात मुद्या क्र. २ मध्ये त्यांनी ११ नकाशे नमूद केले आहेत व प्रत्यक्षात दोनच नकाशे दिले आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक २ मध्ये रुपये २१०/- व मुद्या क्र. ३ मध्ये रुपये १०५/- हे परत करणे संयुक्तिक राहील. यापुढे जनमाहिती अधिकारी यांनी काळजीपूर्वक नियमांचा उल्लेख करुन आकारणी करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आत मुद्या क्र. २ च्या संदर्भात रुपये २१०/- व मुद्या क्र. ३ च्या संदर्भात रुपये १०५/- हे परत करण्यात यावे. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६४७/नाग/२०१०**

१. कु. सुलभा माधवराव पवार, - **अपीलकर्ती**
नबिरा महाविद्यालय काटोल.
जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य - **उत्तरवादी**
नबिरा विद्यालय काटोल, जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
नबिरा विद्यालय काटोल, जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक १७/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ती यांनी दि. ०५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड ए. एम. नबीरा हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दि. ०१/१२/२००९ रोजी माहिती अधिकारी नबीरा महाविद्यालय काटोल यांचेकडे पदोन्नती बाबत माहिती मिळणेबाबत व सेवापुस्तिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत तसेच निवृत्ती वेतनासोबत (पेन्शन केस बरोबर) लावलेल्या कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसते. त्यामधे श्रीमती के. एन. गुडधे, शारीरीक महिला शिक्षिका यांच्या सेवा पुस्तिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत, श्री एस.एफ. वानखेडे प्रबंधक, यांच्या नेमणुकीसंबंधी विद्यापीठाची मंजूरी आदेशाची साक्षांकित झेरॉक्स प्रत व विद्यापीठाच्या मंजूरी रोष्टरची मंजूर प्रत. सेवापुस्तिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत व निवृत्ती वेतनासोबत निवृत्ती वेतन मंजूर

करण्याकरीता सेवापुस्तिकेबरोबर लावलेल्या संपूर्ण कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत मिळणेबाबत, लेखापालाच्या पदोन्नतीबाबतचे विद्यापीठाच्या मंजूर रोष्टरची प्रत, सेवाजेष्ठता यादी, स्थानिय प्रबंध समितीचा ठराव व कार्यालयीन आदेश. अधिक्षकाच्या पदोन्नतीबाबतचे विद्यापिठाच्या मंजूर रोस्टरची प्रत, सेवाजेष्ठता यादी, स्थानिय प्रबंध समितीचा ठराव व कार्यालयीन आदेश. प्रबंधकाच्या पदोन्नतीबाबतचे विद्यापीठाच्या मंजूर रोस्टरची प्रत, सेवाजेष्ठता यादी, स्थानिय प्रबंध समितीचा ठराव व कार्यालयीन आदेश. श्री बी. एम. तिजारे, श्री डी.एन. वाळके, श्री डी. व्ही. पराते, श्री के.बी. नागदेवे, श्री ए. पी. पाटील, श्री एस. डी. खडसे, श्री पी. डब्लयू नेरकर, श्री के. एस. सावरकर, श्री. पी. डी. चरडे व सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हजेरीपटाची साक्षांकित झेरॉक्स प्रत, वर्ष २००५ ते २००९ या कालावधीतील अशी एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दि. ०४/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपीलकर्ती यांना दि. ३०/०१/२०१० च्या पत्रान्वये मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक प्रमाणात असल्यामुळे माहिती पुरविण्यास वेळ लागेल त्याकरीता दि. १५/०२/२०१० पर्यंत आपणास माहिती पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ती यांना दि.२२/०२/२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सोबत छायांकित प्रती सुध्दा दिलेल्या दिसून येतात. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती करीता रुपये २०००/- भरुन माहिती घेण्यात आलेली आहे. परंतू प्रत्यक्षात त्यांना माहिती कमी देण्यात आली आहे. तसेच दिलेल्या माहिती मध्ये अपूर्ण माहिती दिलेली आहे. अपूर्ण माहितीच्या संदर्भात अपीलकर्ती यांना विचारले असता त्यांनी उपलब्ध असलेल्या माहिती मधूनच विश्लेषणात्मक माहिती किंवा निर्णय योग्य घेतला नाही असे आयोगास सांगितले. यावरुन अपीलकर्ती यांना चुकीची व अपूर्ण माहिती न देता जशी आहे तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. अर्ज आल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे जनमाहिती अधिकारी यांनीच मान्य केले असल्यामुळे अपीलकर्ती यांना अतिरिक्त माहितीचा खर्च रुपये २०००/- हे परत करणे अधिनियमाचे कलम ७ (६) अन्वये संयुक्तिक राहील. परंतू

अपीलकर्ती यांना माहिती मात्र उपलब्ध झाली आहे असे आयोगाचे मत झाले आहे. परंतू माहितीचा अतिरिक्त खर्चाचा भरणा परत करण्याचे संदर्भात अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यांनी अतिरिक्त खर्चाकरीता भरलेले रुपये २०००/- त्यांना परत करण्यात यावे. तसे न केल्यास व अपीलकर्ती यांनी तक्रार केल्यास जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६८६/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री यशवंत बालाजी हिरेखण<br>५६९, नविन सुभेदार ले आऊट, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.०८/१०/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, रामटेक यांचेकडे राणी दुर्गावती यांचे किल्ला परिसर गढराज्याची मौजा डोंगरताल येथील जमिनीच्या माहिती बाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ११/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर दि. २९/१२/२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत, त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २३/०१/२०१० रोजी उपलब्ध माहितीच्या संदर्भात पत्र दिले होते. त्या पत्राच्या संदर्भात दि.१७/०२/२००९ रोजी पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे. ३. अपीलकर्ता यांनी दि. ३०/१०/२००९ रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भात दि. २६/११/२००९ रोजी सुध्दा माहिती काही उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१०/०२/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना संबंधीत कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या कागदपत्रांच्या आधारे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना दिलेल्या मुद्येनिहाय माहितीच्या संदर्भात उपलब्ध असल्यामुळे कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६५०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मुरलीधर शंकरराव डफ<br>रा. काजळसरा ता. हिंगणघाट जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (राजस्व)<br>उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार<br>तहसीलदार कार्यालय हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उ पस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे नायब तहसीलदार श्री जे. पी. कुंवर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगणघाट यांचेकडे त्यांनी दिलेल्या दि.१५/०१/२०१० रोजीच्या संदर्भातील अपीलकर्ता यांनी दिलेल्या दि. ०३/०१/२०१० रोजीच्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली आहे. माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०२/२०१० ला अपीलकर्ता यांना तहसीलदार हिंगणघाट यांनी एकूण चार मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे दिसून येते. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रथम

अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. २१/०४/२०१० रोजी निर्णय झाला असून माहिती उ पलब्ध झालेली असल्यामुळे पुढील कार्यवाही करावयाची आवश्यकता नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या शेतीतील अतिक्रमण काढण्यात यावे. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचा जो अर्ज आहे व त्या अर्जामध्ये जी कार्यवाही करण्याचे त्यांना विचारले आहे त्या संबंधातील कार्यवाही ही वरोरा तहसीलदार यांचेकडून करणे आवश्यक आहे. तहसीलदार हिंगणघाट यांना जी कार्यवाही करावयाची आहे ती कार्यवाही मुद्या क्र. १ मध्ये झालेली आहे. अपीलकर्ता यांचे मुद्या क्र.३ हे वरोरा तालुक्याशी संबंधीत आहे. त्यामुळे त्या तालुक्यातून कार्यवाही करणे आवश्यक राहील. तसेच तलाठी यांचेकडून जी माहिती उ पलब्ध होईल ती घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सांगितले. तसेच अपीलकर्ता यांचे जागेवरील अतिक्रमण काढून घेण्याची विनंती केली आहे. परंतू असे करता येत नाही कारण ते आयोगाचे अधिकारात येत नाही त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांना माहिती उ पलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६६७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री माणिकराव विश्रामजी डिवरे<br>विठाई, साईबाबा ले आऊट, प्लॉट नं. २,<br>साईमंदीराजवळ, अयोध्यानगर नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०२४ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद नांदेड<br>ता.जि. नांदेड | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नांदेड<br>ता.जि. नांदेड | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नांदेड यांना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधे कार्यरत ग्रंथपालांना मिळालेल्या ५ व्या वेतन आयोगानुसार मिळालेल्या वेतन श्रेणींची माहिती खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर मागितलेली दिसून येते.

१. पूर्णवेळ प्रशिक्षित पदवीधर ग्रंथपालांची वेतनश्रेणी

२. अर्धवेळ प्रशिक्षित पदवीधर ग्रंथपालांना देण्यात आलेली वेतनश्रेणी

३. पूर्णवेळ प्रशिक्षित पण पदवीधर नसलेल्या ग्रंथपालांना देण्यात आलेली वेतनश्रेणी

४. अर्धवेळ प्रशिक्षित पण पदवीधर नसलेल्या ग्रंथपालांना देण्यात आलेली वेतनश्रेणी

५. श्री एस.डी. देशमुख ग्रंथपाल, इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नवीन नांदेड यांना २३ जून १९९८ पासून ५५००-१७५-९००० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. ही वेतनश्रेणी मंजूर झालेल्या ग्रंथपालांची संख्या द्यावी यापैकी अर्धवेळ ग्रंथपाल जे पदवीधर प्रशिक्षित आहेत त्यांना या वेतनश्रेणीच्या निम्मे वेतनश्रेणी मान्य केली आहे काय?

सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. ०३/०३/२०१० रोजी आपले संदर्भीय अर्जात नमूद माहितीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम २ (च) नुसार माहिती या संज्ञेत येत नाही. सबब आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे कळविल्याचे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. ११/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही शासन निर्णय किंवा परिपत्रकाच्या संदर्भाच्या प्रमाणे मागितलेली आहे व त्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहिती या व्याख्येमध्ये शासन निर्णय परिपत्रके इ. चा समावेश होतो. अपीलकर्ता यांनी ५ व्या वेतन आयोगानुसार मिळालेल्या वेतनश्रेण्यांची माहिती मागितलेली आहे. याचाच अर्थ त्या संदर्भामध्ये आदेशातील निर्णयाची माहितीच उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतू जनमाहिती अधिकारी यांची प्रवृत्ती अजुनही माहिती उपलब्ध न करुन देण्याचीच दिसून येते व त्यामुळे अशाप्रकारची निरर्थक व संक्षिप्त उत्तरे दिलेली दिसून येतात. यावरुनच माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे हे सिध्द होते. अर्जदार जेव्हा माहितीच्या अर्जात माहिती मागतात त्यातून त्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे असे माहितीचा अधिकार या व्याख्येत येते. परंतू माहिती अधिकारी अर्धवट कारणे देत असतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखलच घेतली नाही व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी कागदपत्रे हवी आहेत त्याबाबत त्यांनी लेखी स्वरुपात दिलेले नाही. परंतू तरी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती तयार आहे असे दिसते याचा अर्थ त्यांचेकडे माहिती उपलब्ध होती व ती माहिती त्यांना माहितीच्या अर्जाप्रमाणे सुध्दा देता आली असती. आयोगाची नोटीस आल्यावर मात्र माहिती अर्जदाराला उपलब्ध करुन दिली जाते याचा अर्थ जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. शास्तीच्या बद्यल त्यांना विचारले असता ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. दिशाभूल करणारी उत्तरे का दिली त्याबद्यलही ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांचेकडे आलेल्या माहितीच्या संदर्भात ते काळजीपूर्वक माहिती उपलब्ध करुन देतील असे अपेक्षित आहे. जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती आणली आहे ती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली आहे. माहिती मिळाल्याने अपीलकर्ता यांचे समाधान झाले आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र शास्तीच्या संदर्भात अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे व निरर्थक उत्तर दिले असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून करुन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

२.	सदरच्या शास्तीची वसूली ही मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वंतत्रपणे पाठविण्यात यावी.

३.	अपीलकर्ता व उ त्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिति आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६६४/नाग/२०१०</u>**

१. श्री मिलिंद दिगांबर गजभिये - **अपीलकर्ता**
मु. फेटरी पो. खानगांव
ता. काटोल जि. नागपूर - ४४१ ३०२

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
उपविभाग काटोल ता. काटोल जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार
ता. काटोल जि. नागपूर - **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.२४/०२/२०१० रोजी तहसीलदार काटोल यांचेकडे आबादी भुखंडातील प्लॉट बाबत खालीलप्रमाणे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

१. दिनांक २२/०६/०७, दि.१३/०३/०८, दि. २४/०६/०९, ०६/०७/०९ व २७/०१/२०१० च्या तारखांना आबादी भूखंडातील प्लॉट मिळणेबाबत केलेल्या अर्जाची सविस्तर मुद्येसुद माहिती द्यावी.

२. दिनांक २७/०१/१० रोजी दाखल केलेल्या अर्जाची सविस्तर माहिती द्यावी,

३.	प्लॉट वाटपासंबंधी शासकीय आदेश, परिपत्रक, जी. आर. उपलब्ध असल्यास देण्यात यावा.४. जाहीरनाम्याची प्रत देण्यात यावी.



अशाप्रकारची माहिती शिघ्र व्यक्तीशः हवी आहे असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.१२/०३/२०१० रोजी आबादी भुखंड क्रमांक प्लॉट वाटपाची कार्यवाही सुरु आहे असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि.२९/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०/०६/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. नायब तहसिलदार काटोल तथा जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिनांक १०/०६/२०१० रोजी पुरविण्या बाबतचा अहवाल सादर केला आहे. तसेच अपीलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याची पोच दिलेली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देऊनही सदरचे अपील हे खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे परंतू उर्वरीत माहिती एक महिन्यात देतो असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना आश्वासन दिले असल्यामुळे त्यांची काहीही तक्रार नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१.	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना उर्वरीत माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा शास्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६६८/नाग/२०१०**

१. श्री सुरेश गोविदा गिऱ्हेपुंजे -
**अपीलकर्ता**
वार्ड क्र. ३, तामसवाडी (तुडका) पोष्ट-खापा (तुमसर)
ता. तुमसर जि. भंडारा. - ४४१ ९१३

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी -
**उत्तरवादी**
पंचायत समिती तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत कार्यालय तुडका
ता. तुमसर जि. भंडारा. -
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे निर्मल ग्राम पुरस्काराच्या संदर्भामध्ये मिळालेल्या निधीचे खर्चाच्या नियोजना बाबत खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

१. निर्मल ग्राम पुरस्कार म्हणून प्राप्त निधीतून ग्राम पंचायतीने खर्च करावयाचे तरतुदी सबंधात शासन निर्णयाची प्रत.

२. निर्मल ग्राम योजनेत दारिद्रय रेषेखालील किती लाभार्थ्यांचे शौचालय बांधकाम पूर्ण झाले आहे त्याची यादी,

३. ज्या लाभार्थ्यांचे शौचालय टाकी बनवून प्लाटफॉर्म सिट बसविले लेव्हल पर्यंत आहेत त्याचे शौचालयास आडोसा भिंती तयार करणे बाबत ग्राम पंचायतीकडून काही उपाययोजना केल्या आहेत ? त्याच्या निर्णयाची ठराव प्रत.

४. सन २००८-२००९ या वर्षी निर्मल ग्राम योजनेची अमंलबजावणी करण्याकरीता ग्रा. प. ची लोकसंख्या किती दाखविण्यात आली यात ग्रा. पं. ने तुडका व तामसवाडी या दोन्ही गावाचा समावेश केला होता काय ? त्या कालावधीत ग्रा. पं. ने किती पूर्ण बांधकाम केलेले सार्वजनिक शौचालय व खाजगी शौचालय यांची संख्या शासनास सादर केली त्याबाबतची माहिती प्रत.

५. निर्मल ग्राम पुरस्कारातून जमा असलेली निधी खर्च करण्याकरीता ग्रा. पं. ने कोणत्या तारखेस कोणत्या (मासिक विशेष तातडीची किंवा ग्रामसभा) व किती सभासदांच्या उपस्थितीत निर्णय घेतला त्याची सभासदांच्या नावासहीत ठराव प्रत.

सदर माहितीचे वर्ष २००८, २००९, २०१० या कालावधीतील असून माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळालेली आहे ती माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे तसेच मागितलेल्या माहितीशी न जुळणारी अशी दिलेली आहे. परंतू त्याबाबत त्यांना स्पष्टीकरण करता आले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती दि. १३/०५/२०१० रोजी देण्यात आली आहे. याचा अर्थ ती माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयानुसारच देण्यात आली आहे. म्हणजेच विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचेकडे दोन ग्राम पंचायतींचा प्रभार असल्यामुळे अपीलकर्ता यांना ती माहिती मुदतीत पुरविता आली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती देण्याचा उल्लेख आलेला आहे असे असले तरी सदरची माहिती ही विलंबानेच देण्यात आली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून दोषी आढळून येतात त्यामुळे ते

शास्तीस पात्र आहेत. जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लावणे बद्यल विचारले असता यापुढे अशी चूक होणार नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती ही विलंबाने देण्यात आली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते.

२. सदरची शास्तीची वसूली ही खंडविकास यांनी सचिव ग्राम पंचायत यांचे वेतनातून करण्यात येऊन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६६६/नाग/२०१०**

१. श्री शेख करिम वल्द शेख गफुर - **अपीलकर्ता**
लोहारपुरा, भाटापारा बिल्डिंग, मस्जिद के पास, नागपूर
ता. जि. नागपूर

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त/प्रभाग अधिकारी - **उत्तरवादी**
गांधीबाग झोन क्र.६, महानगर पालिका नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा झोनल अधिकारी (स्वास्थ) - **उत्तरवादी**
गांधीबाग झोन क्र.६, महानगर पालिका नागपूर

**(आदेश पारित दिनांक १९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे सोबत ॲड. एन.एस. आवले हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी लोहारपुरा विभाग म.न.पा. गांधीबाग झोन -६ यांचेकडे लोहारपुरा भाटापारा मस्जिद जवळ रेती व गिट्टी टाकून रोडवर अडथळा निर्माण केल्याबद्यल अर्जदाराने केलेला तक्रार अर्ज दि. २०/०१/२०१० आपल्या विभागाने काय कार्यवाही केली त्याबद्यल तपशीलात माहिती देण्यात यावी अशी विनंती केलेली दिसते. ही माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १७/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उशिरा उपलब्ध करुन दिल्यामुळे

प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असलेली दिसून येते. अशाप्रकारची माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अभिप्रेत नाही असा नवीनच शोध प्रथम अपीलीय अधिकारी यांनी लावून सदरचे अपील खारीज केले आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती दिली होती ती विलंबाने दिली तसेच कागदपत्रे दिलेली नाहीत. विलंबाच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे किंवा कसे या संभ्रमामुळे ती माहिती अपीलकर्ता यांना विलंबाने देण्यात आली आहे. तसेच ती माहिती अपीलकर्ता यांना त्याच विभागातून मिळाली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारलेल्या माहितीत कोणता प्रश्न दिसून आला हे आयोगास मात्र आढळून आले नाही. काय कार्यवाही केली हा जरी प्रश्न असेल तर त्यातून जी कार्यवाही केली ती कागदोपत्री केली जाते त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व हे सर्वसाधारण व्यक्तीला सुध्दा समजण्या सारखेच आहे. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र नवीनच अर्थ लावलेला दिसून येतो. असे असले तरी माहिती विलंबाने दिलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते.

२.	सदरची शास्तीची वसूली ही आयुक्त महानगर पालीका यांनी सक्षम अधिकाऱ्यांच्या माध्यमातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार

**...३...**

(००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत म.न.पा. आयुक्त यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६६५/नाग/२०१०</u>**

१. श्री दत्तात्रय कृष्णराव पितळे -
**अपीलकर्ता**
१३, दंडिगे ले-आऊट, शंकरनगर, नागपूर
ता. जि. नागपूर - १०

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा स्थावर अधिकारी -
**उत्तरवादी**
महानगर पालिका नागपूर

३. जनमाहिती अधिकारी -
**उत्तरवादी**
(स्थावर विभाग) महानगर पालिका नागपूर

**(आदेश पारित दिनांक १९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे उशीरा हजर झाले. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचेकडे होर्डींग लावण्या संदर्भातील मनपा आयुक्त यांनी काय कार्यवाही केली याबाबत एकूण ७ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. मनपा आयुक्त यांना लोकशाही दिन दिनांक १८/०८/२००८ लक्ष्मीनगर क्षेत्रिय कार्यालयाकडून पाठविलेले पत्र दि.२२/०९/२००८ व सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. साप्रवि/२१० - ए /एम, दिनांक ३०/०८/२००८ च्या संदर्भात आपल्या विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली ती दिनांक निहाय कळविण्यात यावी.

२. हे होर्डींग कोणत्या वर्षापासून उभे केले आहे.

३. याकरीता जमीन मालकाची लेखी परवानगी घेतली काय ?

४. कोणत्याही प्लॉट समोर अथवा जमीन मालकाच्या जागेत परवानगी शिवाय होर्डींग लावता येते काय ?

५. हे होर्डींग महानगरपालिकेने जाहिरातदारास दिले आहे की, जाहिरातदाराने स्वतःहून लावले आहे.

६. महानगरपालिकेने जाहिरातदाराकडून होर्डींग लावलेल्या वर्षापासून आजपावेतो दरवर्षी किती उ त्पन्न प्राप्त केले आहे त्याची वर्ष निहाय आकडेवारी द्यावी.

७. हे होर्डींग किती दिवसात काढण्याचे प्रस्तावित आहे ?

सदर माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०९/०४/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू त्यातील मुद्या क्र. ३, ४ व ७ हे प्रश्नार्थक स्वरुपाचे असून माहिती अधिकारात येत नसल्यामुळे माहिती अधिकारात उत्तर देता येत नाही असे कळविण्यात आले आहे. तसेच इतर माहिती सुध्दा ही त्रोटक उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १६/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा ०४/०५/२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकाऱ्यांनी उपरोक्त माहिती उपलब्ध असल्यास १० दिवसात द्यावी या निर्णयाप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधन न झाल्याने त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळालेली आहे ती माहिती न मिळाल्यासारखीच आहे. जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही मुद्यांच्या संदर्भात समाधानकारक उत्तर दिलेले नाही. व मुद्या क्र. ३ व ४ हे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याने माहितीच्या अधिकारात येत नाही असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांचे मुद्या क्र. २, ३, ४ मध्ये होर्डींग हे कोणत्या वर्षीपासून उभे केले आहे याकरीता जमीन मालकाची परवानगी घेतली आहे काय ? कोणत्याही प्लॉट समोर अथवा जमीन मालकाच्या जागेत परवानगी शिवाय होर्डींग लावता येते काय ? असे जरी प्रश्नार्थक स्वरुपात विचारले असले तरी त्या संदर्भात कागदपत्रांचे स्वरुपातील माहिती उपलब्ध असल्यास कागदपत्रांच्या छायांकित प्रती देणे अपेक्षित असते. माहिती मागण्याचा व प्रश्नाचा आशय विचारात घेणे आवश्यक असते. वाक्यात 'काय' 'किंवा' आणि 'कोणते' शब्द

वापरले म्हणजेच तो प्रश्नहोतो, व माहिती देता येणार नाही हे म्हणजे योग्य नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे मत, अभिप्राय अभिप्रेत असेल तरच ते माहितीच्या अधिकारात येत नाही. मात्र ज्या प्रश्नातून कार्यवाही केलेली टिपणी उपलब्ध होवू शकते. त्यातून कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अभिप्रेत असते. अपीलकर्ता यांनी जे मुद्दे विचारले आहेत त्यातूनच नियमाच्या प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या नंतर मात्र त्याच अधिकाऱ्यांनी योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते, जी अपीलकर्ता यांना ३० दिवसाचे आतच उपलब्ध करुन देता आली असती. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णयामध्ये माहिती उपलब्ध होईल अशाप्रकारे निर्णय दिलेला दिसून येत नाही. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी हे त्याच कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी असतात त्यामुळे माहिती ही त्यांच्या मार्फत त्याच सुनावणीचे वेळी उपलब्ध करुन देणे शक्य असते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यापुढे प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या वेळेसच माहिती उपलब्ध होईल असे पाहावे. परंतू अपीलकर्ता यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये ते शास्तीस पात्र आहेत. शास्ती बद्यल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, यापुढे अशी चूक होणार नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या मुद्यांप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रत्येक मुद्येनिहाय कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. Outdoor advertising policy २००१ (सुधारित आवृत्ती २००१) ची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली आयुक्त म.न.पा. यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६७७/नाग/२०१०</u>**

१. श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे -

**अपीलकर्ता**

रा. सावनेर वार्ड क्र.१७

ता. सावनेर जि. नागपूर

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक -

**उत्तरवादी**

सहकारी संस्था, नागपूर

धनवटे चेम्बर्स, सिताबर्डी, नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक -

**उत्तरवादी**

सहकारी संस्था, नागपूर

प्लॉट नं. ८, सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर

**(आदेश पारित दिनांक २१/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे दिनांक २८/०६/२०१० च्या सुनावणीस गैरहजर आहेत मात्र २१/०६/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २३/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे तपासणी अहवालात गंभीर आरोप दि. १७/११/२००८ ची तक्रार व सावनेर कृषी उत्पन्न बाजार समीतीत मनमानी कारभार या संदर्भात दि. १७/११/२००८ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १६/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. १२/०३/२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला दिसतो. माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २६/११/२००९ रोजीचे पत्रान्वये दोनही तक्रार अर्जाचे अनुषंगाने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. सावनेर यांचेकडे तपासणी अहवाल मागविलेला दिसून येतो. सदर बाबतीत सध्या अहवाल प्राप्त न झाल्याने आपणास सदरचा अहवाल देता येत नाही असे कळविलेले असल्यामुळे व तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयापर्यंत सुध्दा चौकशी झालेली नसल्याने व चौकशी अहवाल प्राप्त न झाल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अर्जावर ३० दिवसांचे आत चौकशी अहवाल प्राप्त करुन अपीलकर्ता यांना विनामुल्य प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. ०१/०४/२०१० रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या प्रतीची ६ पाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेले दिसून येतात. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले. अपीलकर्ता गैरहजर असले तरी त्यांनी त्यांचे द्वितिय अपील मेमोमध्ये माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिलेली आहे असे नमूद केले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज हा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे केला असल्याने त्यांना चौकशी ही शासकीय अधिकारी यांचेकडून अभिप्रेत आहे मात्र अपीलकर्ता यांचे तक्रारीच्या चौकशीकरीता अहवाल जरी मागविलेला असेल किंवा त्यांना उपलब्ध करुन दिला असेल तरी त्यांचे म्हणणे असे आहे की, शासकीय अधिकारी यांनी चौकशी करुन अहवाल द्यावा. परंतू ज्या अधिकाऱ्याकडे चौकशी सोपविण्यात आली होती त्यांची बदली झाली आहे व नवीन अधिकारी यांचेकडून चौकशी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आत संबंधीत चौकशी अधिकाऱ्यास चौकशी पूर्ण करण्याचा आदेश देऊन चौकशी अहवाल उपलब्ध होईल. असे अपीलकर्ता यांना कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६९३/नाग/२०१०</u>**

१. श्री कुशाब दादाजी कुटे -
**अपीलकर्ता**
रा. पिंपळगांव (लोखंडी) पो. गिरड
ता. समुद्रपूर जि. वर्धा

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) -
**उत्तरवादी**
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक -
**उत्तरवादी**
आदर्श विद्यालय साखरा
पो. कोरा तो. समुद्रपूर जि. वर्धा

**<u>अपील क्र. ६९४/नाग/२०१०</u>**

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक -
**उत्तरवादी**
आदर्श माध्यमिक विद्यालय सेलू (मुरपाड)
पो. सावली (वाघ) ता. हिंगणघाट जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक २८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपील क्र. ६९३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हे हजर आहेत जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती गोलाईत हजर आहेत. अपील क्र. ६९४/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हे हजर

आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे मुख्याध्यापक श्री संजय प्र. सावळे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती गोलाईत हजर आहेत.

२. अपील क्र. ६९३/नाग/२०१० मध्ये श्री गोलाईत यांनी दि. २०/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे सन १९८७ ते १९९१ या कालावधीत श्री आर. वाय. पाटील कनिष्ठ लिपिक आदर्श विद्यालय साखरा यांच्या नियुक्ती आदेशाची साक्षांकित प्रत तसेच त्यांची बदली आदर्श विद्यालय पिंपळगाव येथे करण्यात आली त्या बदली आदेशाची साक्षांकित प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे, व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे असेही नमूद केले आहे.परंतू प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २०/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपील क्र. ६९४/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. २०/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक आदर्श माध्यमिक विद्यालय सेलू यांचेकडे कनिष्ठ लिपिक श्री पी. आर. मोघे व श्री ए. व्ही. ठाकरे आदर्श माध्यमिक विद्यालय सेलू (मुरपाड) यांच्या नियुक्ती आदेशाची व श्री ए. व्ही ठाकरे यांच्या बदलीच्या संदर्भातील आदेशाच्या साक्षांकित प्रतीची मागणी केलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २०/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले. अपील क्र. ६९३/नाग/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत परंतू अपील क्र. ६९४/नाग/२०१० मध्ये जनमाहिती अधिकारी हे हजर असून त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थेमध्ये वाद असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. जर अपीलकर्ता यांना माहिती दिली असती तर संस्थेने जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही केली असती, माहिती ही जनमाहिती अधिकारी यांचेकडेच उपलब्ध आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की, दि.२९/०५/२०१० ला प्रथम अपील ठेवण्यात आले परंतू मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी, दोन्ही पक्ष सुनावणीस हजर झाले नाहीत. त्यामुळे निर्णय देता आलेला नाही व अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात आले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सुनावणीच्या तारखेनंतर त्यांना पत्र मिळाले. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोनही प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केल्यामुळे सदरची दोनही अपीले निकाली काढणे संयुक्तिक होईल.

## आदेश

१. अपील क्र. ६९३/नाग/२०१० व अपील क्र. ६९४/नाग/२०१० या अपीलांमध्ये अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत दोनही प्रथम अपीलांची सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देऊन त्याच वेळेस माहिती उपलब्ध होईल असे पहावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६९२/नाग/२०१०</u>**

१. श्री ठाकुरसिंघ बावरे -
**अपीलकर्ता**
स्टेशन फैल, इंदिरा गांधाी वार्ड, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी -
**उत्तरवादी**
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी -
**उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी कार्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक २८/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. आहे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी १२/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांचेकडे धर्मराज मोतीराम झोटींग रा. नारायणपूर ता. समुद्रपूर यांची मौजा नारायणपूर शेत सर्व्हे नंबर ३५, क्षेत्र १.२१ हेक्टर जमीन सन १९८८ - १९८९ चे अकृषक आदेशाची प्रत मिळणे बाबत माहिती व्यक्तीगतरित्या घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. १५/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १४/०५/२०१० रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती

अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या प्रकरणाची पून्हा दखल घेऊन शोध घ्यावा व अपीलकर्ता यांना माहिती ही विनामुल्य देण्यात यावी असा आदेश दिला आहे. व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीचा शोध घेण्यात येत आहे. अपीलकर्ता स्वतः सुध्दा नस्ती शोधण्याचे वेळेस हजर होते. त्यावेळी सुध्दा ती नस्ती उपलब्ध झाली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा नस्ती शोधण्याचे काम सुरु आहे असे आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांना ज्या क्षेत्र दुरुस्तीच्या संदर्भातील नस्तीतील मुळ आदेश आवश्यक आहे ते प्रकरण सुध्दा सुरु आहे, माहिती सुध्दा उपलब्ध करुन देता येईल व कार्यवाही सुध्दा करुन देता येईल. अपीलकर्ता यांनी सुध्दा ही बाब मान्य केली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीचा शोध हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत घेण्यात यावा व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६७६/नाग/२०१०</u>**

१. श्री जनार्दन गुलाबराव मून - **अपीलकर्ता**
केन्द्रीय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच
७९१, नागसेन वन, नागपूर - १७

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २१/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेआहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. दिनांक २१/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी श्री एम. आर. रामटेके हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री कमल किशोर फुटाणे हजर होते. २८/०६/२०१० रोजी अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी श्री आर. पी जगताप हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २५/०३/२०१० ला उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कक्ष अधिक्षक जिल्हा परिषद नागपूर (सामान्य प्रशासन विभाग) यांचेकडे अपंग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पूणे यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना लिहिलेल्या दि.१८/०३/२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने

स्वयंसेवी शासन मान्य अपंग शाळा / कर्मशाळेतील मागासवर्गीय / अपंग कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २८/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०३/०५/२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपील हे समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग नागपूर यांचे कार्यालयात दाखल करावे असे कळविलेले दिसून येते. परंतू प्रथम अपीलावर सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अद्याप पर्यंत त्यांना माहिती मिळाली नाही किंवा कोणत्याही प्रकारचे पत्र सुध्दा मिळाले नाही व त्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती मागितली होती तो अर्ज समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला हे योग्य नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्या पत्रावर कार्यवाही विचारलेली आहे तो विषय हा समाज कल्याण विभागाचा असल्यामुळे सदरचे पत्र माहिती अधिकारी समाज कल्याण यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले. परंतू त्यांनी त्या पत्रावर कार्यवाही केलेली नाही व म्हणूनच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

सदरचा अर्ज हा दि. २६/०३/२०१० रोजी हस्तांतरीत करण्यात आला आहे. यावरुन जनमाहिती अधिकारी समाज कल्याण विभाग यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात. व त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जाच्या संदर्भामध्ये अर्जदार यांना ३० दिवसांचे आत वस्तुस्थिती कळविणे आवश्यक आहे याची समज येईल. जनमाहिती अधिकारी जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग नागपूर यांनी आयोगापुढे खुलासा करतांना आयुक्तां समोर दि. १८/०३/२०१० च्या पत्रावर कार्यवाही करणे करीता अपंगाच्या सर्व संस्थांमध्ये बैठक घेणे आवश्यक असून व अपंगांच्या सर्व संस्था संचालकांची दि. ११/०६/२०१० रोजी बैठक घेण्यात आली असून त्यामधे त्यांनी दि. १८/०३/२०१० चे पत्रान्वये सर्व सुचना देण्यात आल्या आहेत असे नमूद केल्याचे दिसून येते. हीच माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते परंतू जनमाहिती अधिकारी यांनी काहीच न केल्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागले. प्रथम अपीलामध्ये सुध्दा

कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीच उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत दि. १८/०३/२०१० चे पत्रावर झालेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांच्या दि. २५/०३/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७ (१) अन्वये ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संबंधीत तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येते.

   सदरच्या शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी समाज कल्याण विभाग यांचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ६९१/नाग/२०१०**

१. श्री भगवंत नारायणराव साखरकर - **अपीलकर्ता**
रा. श्री शामराव भोमले यांचे मकान, पी ॲण्ड टी कॉलनी,
साईनगर वर्धा
ता. जि. वर्धा

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उ पमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) -
**उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि) -
**उत्तरवादी**
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक २८/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उ पस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उ त्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दि. ०१/०७/२००८ पासून ते ०५/१२/२००८ चा जी. आर. सह आज पर्यंत प्राप्त झालेल्या जी. आर. परिपत्रके तथा Circular च्या प्रमाणीत झेरॉक्स प्रति मराठीत पाहिजेत अशी माहिती दि. ०१/०७/२००८ ते आजपर्यंत या कालावधीतील मागितलेली दिसते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.

३.	अर्जाच्या अनुषंगाने दि. १७/०३/२०१० च्या पत्रान्वये आपणास नेमके कोणते शासन निर्णय हवे आहेत असे स्पष्टपणे नमुद केलेले नाही. त्यामुळे आपणास नेमकी कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याचा बोध होत नाही. आपणास हवे असलेले शासन निर्णय दिनांकासहीत व विषयासहित स्पष्टपणे नमूद करावे जेणेकरुन आपणास माहिती देणे सोयीचे होईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. ०३/०४/२०१० रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १९/०४/२०१० रोजी देण्यात आलेला असून त्यात जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले पत्र योग्य आहे. अपीलकर्ता यांनी नेमक्या शासन निर्णयाची मागणी करण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही अपीलकर्ता यांनी दि. ३०/०४/२०१० च्या पत्रान्वये सर्वच जी. आर. circular मागितलेले असल्यामुळे, कोणते शासन निर्णय पाहिजे याचा संबंध येत नाही, फक्त शुल्क किती होते याबाबत मागणी करावी असे कळविल्याचे दिसून येते.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, अपीलकर्ता यांनी शासन निर्णय Circular व परिपत्रके यांचे वर्णन न करता कार्यालयात आलेले सर्वच शासन निर्णयाची माहिती मागितलेली आहे. शासनाच्या विविध विभागातून व त्या विभागातील विविध कार्यासनांमध्ये रोज नवीन जी. आर. पारित होत असतात व तसे ते सर्व जी. आर. जिल्हा परिषदेतील विविध कार्यासनास त्या - त्या विषयांप्रमाणे प्राप्त होत असतात व त्यामुळे जी. आर. चा निश्चित कालावधी नाही, निश्चित वर्णन नाही अशा परिस्थितीत अपीलकर्ता यांना कोणता जी. आर. उपलब्ध करुन द्यावा व किती जी. आर. द्यावे असा प्रश्न उपस्थित होतो. हे सर्व जी. आर. काढूनच द्यावे लागणार व त्यामुळे दैनंदिन काम बाजूला ठेवून शासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवून अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्याकरीता अपीलकर्ता यांना मोघम आणि व्यापक स्वरुपात माहिती मागण्याचे सार्वजनिक हित काय आहे असे विचारले असता त्यांनी माहितीचा अधिकार आहे व माहिती पाहिजे आहे असे आयोगापुढे सांगितले. परंतू माहितीचा अधिकार हा निश्चित कागदपत्रांचे वर्णन करुनच वापरायचा असतो याबद्यल त्यांना जाण दिसत नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला जे कळविले ते योग्य आहे. तसेही सर्वच जी. आर. हे वेबसाईट वर उपलब्ध आहेत असेही जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

तसे असल्यास अधिनियमाचे कलम ४ (२), (३), (४) प्रमाणे कार्यवाही झालेली असल्याने अपीलकर्ता यांना वेबसाईट वर त्यांना हवी असलेली माहिती उ पलब्ध करुन घेता येईल. त्याकरीता प्रस्तूतचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ६७८/नाग/२०१०</u>**

१. श्री प्रकाश द्वारकादास कल्याणी -
**अपीलकर्ता**
ब्लॉक नं. ३९-अ, एम. जी. हायस्कूल जवळ, जरीपटका, नागपूर
ता. जि. नागपूर

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -
**उत्तरवादी**
परिमंडळ क्रमांक २, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त -
**उत्तरवादी**
पाचपावली विभाग नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २१/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दिनांक २१/०६/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. एच. डी. ठकवानी. हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. दिनांक २८/०६/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. एच. डी. ठकवानी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे पोलीस उप निरिक्षक श्री शिंदे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे दि.०१/०४/२००९ पासून ची लाऊडस्पिकरचे परवानगी च्या संदर्भात जरिपटका पोलीस स्टेशन अंतर्गत

एकूण नऊ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतू दि. २३/०१/२०१० रोजी माहिती ही प्रश्नार्थक आहे. या कारणास्तव नाकारलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.३१/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय देतांना प्रश्नार्थक स्वरुपाचे मुद्ये असल्यामुळे माहिती नाकारलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. ठकवानी या हजर झाल्या असून त्यांनी युक्तिवाद केला. युक्तिवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी विचारलेल्या नऊ मुद्यांमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी कोणताही अभिप्राय विचारलेला नाही. त्यामुळे ते अभिप्राय विचारणारे प्रश्न नाही तर नऊ मुद्यांमधून ज्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली व परवानगी शिवाय किती व्यक्तींवर कार्यवाही करण्यात आली यात प्रश्न असेल तर त्या संदर्भातील कागदपत्रांची स्टेशन डायरी मध्ये नोंद असून ती उपलब्ध सुध्दा असतात, त्याच कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांनी मागितलेल्या आहेत. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सोयिस्करपणे माहिती टाळण्याच्या दृष्टिने प्रश्नार्थक माहिती आहे या कारणास्तव माहिती नाकारली आहे. जनमाहिती अधिकारी यांना सुध्दा अभिप्रायात्मक प्रश्न आहेत याबाबत सांगता आले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध आहेत असे मान्य केले. असे असले तरी प्रथम अपीलात सुध्दा प्रश्नार्थक माहिती विचारली आहे व निर्बुध्द निष्कर्ष काढण्यात आलेला आहे असे दिसून येते. एखाद्या प्रश्नात 'कोणते' 'किती' असे शब्द जरी वापरले असले तरी त्यातून कागदपत्रांवर झालेली कार्यवाही उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. जनमाहिती अधिकारी यांना एखाद्या प्रकरणी मत विचारणे योग्य नाही, व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणेच अपेक्षित होते. अन्यथा अपीलकर्ता यांना जी माहिती पाहीजे आहे ती कशा प्रकारे मागता येईल या प्रकारचे मार्गदर्शन तरी करणे आवश्यक होते परंतू ते ही जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकर्ता यांच्या दि. ०५/०१/२०१० च्या अर्जातील नऊ मुद्यामधील कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ७१२/नाग/२०१०</u>**

१. श्री आनंद रामभाऊ चिमूरकर - **अपीलकर्ता**
रा. भानापेठ वार्ड नं. २, पोलीस लाईन जवळ, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता उपस्थित आहेत. उत्तरवादी उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, यांचेकडे दि. २५/०३/२००९ चे प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार दिनांक १६/०४/२००२ ते २३/०६/२००८ पर्यंत रजेवर होते नमूद रजेच्या कालावधी नंतर दि. २४/०६/२००८ ला रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे रुजू प्रतिवेदन वर निर्णय घेण्याबाबतचे अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद चंद्रपूर यांना प्रदान केलेल्या अधिकाराची माहिती वा शासन निर्णय / आदेश ची माहिती माहितीचे

अधिकारात पूरविण्यात यावी. कार्यालयाने पत्र दिल्यास माहिती स्वत: घेवून जाता येईल असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २६/०४/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी कोणत्या आदेशा विरुध्द अपील केले हे अपील अर्जात नमूद नाही. व ते सांगू शकत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर हे मा. मु.का.अ. जि. प. चंद्रपूर यांचे नियुक्ती आदेश क्रमांक साप्रवि/स्था/ ३३६७/१९८१ नुसार कनिष्ठ सहाय्यक म्हणून प्रथम नियुक्ती जि.प. हायस्कुल गुंजेवाही येथे केल्यानुसार ते दिनांक २५/११/१९८१ ला नियुक्ती स्थळी रुजु झाले.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, हे पंचायत विभागात कार्यरत असतांना त्यांचेवर पोलीस स्टेशन चंद्रपूर येथे १) अपराध क्रमांक ३०६४/२०००, कलम २९४, ५०९, ५०६, भा.दं.वि. चा दिनांक २५/०९/२००० ला व २) अपराध क्रमांक १८६/२००० कलम ३५४, २९४, ३२३, भा.दं.वि. चा दिनांक २६/०९/२००० ला गुन्हा दाखल झाला होता. त्यादरम्यान प्रशासन त्यांना अडचणीत आणेल म्हणून त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करावी असे अर्जात स्पष्ट नमूद करुन स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करण्यास्तव अर्ज केला. स्वेच्छा निवृत्ती मंजूरीस्तव, उप मु.का.अ. (सा), यांचे समक्ष उपस्थित राहण्यास श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, क. सहा. यांना दिनांक १६/०३/२००२, १८/०३/२००२, १९/०३/२००२ व २६/०३/२००२ अन्वये कळविण्यात आले होते, परंतू वारंवार कळवून सुध्दा ते उपस्थित न झाल्याने त्यांना शेवटी एक संधी दिनांक ०१/०४/२००२ रोजी देण्यात आली. परंतू ते उपस्थित न झाल्याने त्यांना त्यांचे स्वेच्छा नोटीसाच्या अनुषंगाने दि. ३०/०४/२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यात आले.

त्याच दरम्यान त्यांचे विरुध्द दाखल झालेल्या फौजदारी गुन्हयात अनुक्रमे १) अपराध क्रमांक ३०६४/२००० मधील दिनांक २२/०५/२००२ ला कलम २९४ भा.दं.वि. मध्ये १ महिना साधी सजा व दंड रुपये

२०००/-, दंड न भरल्यास १० दिवस साधी सजा, कलम ५०९ भा.दं.वि. मध्ये एक महिना साधी सजा व दंड रुपये २०००/-, दंड न भरल्यास १५ दिवस साधी सजा, कलम ५०६ भा.दं.वि. मध्ये निर्दोष व २) अपराध क्रमांक १८६/२००० च्या गुन्हयात कलम ३५४, २९४, ३२३ भा.दं.वि. मध्ये दिनांक १०/०३/२००३ ला सहा महिने साधी सजा व दंड रु. १०००/-, दंड न भरल्यास दिड महिना साधी सजा अशा प्रकारची सजा झालेली आहे. ती त्यांनी उपभोगलेली आहे.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, यांची दिनांक ३०/०४/२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर केल्यामुळे, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (नियुक्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम २६ मधील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांच्या चांगल्या वर्तवणुकीवर त्यांना निवृत्ती वेतन मंजुरी सबंधात व निवृत्ती उपरान्त सर्वदेय अनुज्ञेय रक्कमांचे वितरण संबंधी आवश्यक कागदपत्रे व फॉर्म भरुन देण्याविषयी कार्यालयीन पत्र दिनांक ०२.०९.०२, १२.१२.०२,०४.०२.०३, २८.०५.०३, ३१.०७.०३, १३.०२.०४, १५.१०.०४, १६.०३.०५, ३०.११.०५ व दिनांक ०७.०२.०६ अन्वये निर्देश देण्यात आलेले होते. त्यांनी कोणत्याही प्रकारचे आवश्यक दस्तऐवज वेळेवर सादर न केल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण प्रलंबित राहीले यास स्वतः श्री आनंद रामभाऊ चिमुरकर हे सर्वस्वी जबाबदार ठरतात. या उपरान्त त्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन दोनवेळा मंजूर करण्यात आले. आता त्यांना निवृत्ती वेतन मंजूर करुन दिलेले आहे व ते सध्या नियमित स्वेच्छा सेवा निवृत्ती वेतन घेत आहेत.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, यांची दिनांक ३०/०४/२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर केल्यानंतर सुध्दा ते आजतागायत जि.प. च्या सेवेत आहेत. अशा प्रकारचे गैरवर्तन करीत असून ते सकाळी १० वाजता येतात व ५.४५ वाजता परत घरी जातात हा त्यांचा नित्यक्रम सध्या सुरु असून प्रशासनास कशा प्रकारे अडचणीत आणता येईल या दृष्टिकोनातून शासनस्तरावर व जि. प. स्तरावर माहितीच्या अधिकारात अनावश्यक पत्रव्यवहार करीत राहतात व माहिती मागत असतात. या बाबत सुध्दा शासनाने अहवालाची मागणी केल्याप्रमाणे शासनास सुध्दा अहवाल सादर केला आहे. शासनाने त्यांचे पत्र क्रमांक सेनिव/४२०५/१६४९/सी.आर.१५६/आस्था-११ दिनांक १९/०८/२००६ नुसार श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, क.स. यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती ची जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही नियमानुसार असल्याचे कळविलेले असून संबंधितांना सुध्दा शासनाने कळविलेले आहे.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर यांचे माहितीचे अपील प्रकरणात दिनांक २०/०३/२०१० ला आदेश पारित करुन त्याचे अपील क्रमांक २०६, २०७, २०८, २०९ खारीज केलेली आहे. तसेच संबंधित कर्मचारी हा कोणत्याही

प्रकारच्या तक्रारी करुन प्रशासनास वेठीस धरत आहे असे आयोगाचे निदर्शनास आल्याने त्यांचे अपील खारीज करण्यात आले आहे.

४. वरील खुलासावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता हे योग्य त्या सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करुन कार्यालयास वेठीस धरत आहेत तसेच सेवानिवृत्त झाल्यावरही कार्यालयात रोज येतात. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा अशाप्रकारे वापर करणे हे गैर असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ७१४/नाग/२०१०</u>**

१. श्री रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर -
**अपीलकर्ता**
अमराई वार्ड मु. पो. राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर - ४४२ ९०५

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी (सा.प्र.वि.) -
**उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) -
**उत्तरवादी**
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.१९/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) जि. प. चंद्रपूर यांचेकडे बाल विद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजुरा र. न. २१४६ या संस्थेच्या गैरव्यवहार संबंधात जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी यांना संस्थेवर कार्यवाही करण्यास्तव पाठविलेल्या पत्रांवर

काय कार्यवाही केली या बाबत एकूण ७ मुद्यांवर लेखी माहिती द्यावी  तसेच आर. के. मारटकर यांचे लेखी बयानाची लेखी प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितली आहे. दि. १५/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. १ च्या संदर्भात माहितीच्या अधिकारात कार्यवाही करुन मिळत नाही या कारणास्तव माहिती उपलब्ध करुन देता येत नाही तसेच इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये रुपये ४/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ०५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २६/०४/२०१० रोजी देण्यात आला असून सदरची माहिती ही शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज हा शिक्षण विभाग (प्राथ.) यांचेकडे सादर करण्यास कळविले. व मुद्या क्र. ८ ची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.        अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली होती त्या  माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिले आहे ते अत्यंत बेजबाबदार पणाचे उत्तर आहे. कोणत्याही मुद्यांचे आकलन न करता माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजे माहिती देण्यास टाळाटाळ करण्यासारखेच आहे. अपीलकर्ता यांनी झालेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी असे स्पष्टपणे मुद्या क्र. १ मध्ये विचारले असता 'माहिती' या शब्दाची व्याख्या देणे व आपले ज्ञान पाजळणे हे सुध्दा बेजबाबदारपणाचे आहे. कक्ष अधिकारी पदासारखे पदावर असणाऱ्या व्यक्तीस मराठी वाक्यांचे अर्थ कळू नये हे दुर्देव आहे त्यामुळे संबंधीत जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेही प्रथम अपीलाच्या सुनावणी मध्ये माहिती ही शिक्षण विभागाची आहे असे निष्पन्न झाले होते. कक्ष अधिकाऱ्यासारखे अधिकारी पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याकडून असे अपेक्षित नसते. व त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी शिक्षण विभागाकडे अर्ज सादर करावा असे कळविले असल्यामुळे व इतर माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील शास्तीच्या करीता मात्र मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली ही जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येऊन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

२. सदरची कार्यवाही खंडविकास अधिकारी यांनी करावयाची आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ७१३/नाग/२०१०**

१. श्री विजय झुंगरुजी नगराळे -
**अपीलकर्ता**
मालवीय वार्ड, वरोरा रेल्वे पुलाजवळ,
ता. वरोरा जि. चंद्रपूर

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त -
**उत्तरवादी**
नगर पालिका प्रशासन, नागपूर
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) -
**उत्तरवादी**
नगर पालिका प्रशासन, नागपूर
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे सहाय्यक प्रादेशिक संचालक श्री विजय देवळीकर उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन नागपूर या कार्यालयामध्ये अवमानना याचिके संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. १३/०१/२०१० रोजी एकूण शुल्क रु. २७/- टपालासहीत भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. २५/०१/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २९/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २५/०२/२०१० रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक माहिती पुरविल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ७९५/नाग/२०१०</u>**

१. श्री विजय नेमराव कांबळे -
**अपीलकर्ता**
सोमलवाडा, वर्धा रोड, पोष्ट खामला, प्रायमरी शाळेजवळ, नागपूर
ता. जि. नागपूर - २५

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविाागीय अधिककारी -
**उत्तरवादी**
नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार -
**उत्तरवादी**
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०९/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०४/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा नागपूर यांचेकडे दि. १२/०९/२००८ रोजी दिलेल्या तक्रारी संदर्भात चौकशी अहवालाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २८/०५/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल करतांना माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २७/०७/२००९ रोजी प्राप्त झाला असून दि. ०४/०८/२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असे सादर केले आहे. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज दि. ०६/०४/२००९ रोजी सादर केला आहे. व अपील दि. २८/०५/२००९ रोजी दाखल केले आहे. त्यामुळे जो सर्व पत्रव्यवहार दाखल केलेला आहे तो पत्रव्यवहार हा जुलै २००९ च्या नंतरचा दिसून येतो. त्यात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना याबाबतची सर्वच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अपील मेमो मध्ये त्यांनी केलेल्या तक्रारीवरील माहिती तसेच तहसीलदार तहसिल हिंगणा जिल्हा नागपूर यांचे कार्यालयीन पत्राच्या अहवालाची प्रमाणित प्रत मिळालेली नाही ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये मागितलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ७१०/नाग/२०१०**

१. श्री दिगंबर नथ्थु रामटेके -
**अपीलकर्ता**
रा. कुंभारे नगर, पिंपरारोड, श्री. राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर, तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा - ४४१९१२

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी -
**उत्तरवादी**
महाराष्ट्र जिवन प्राधिकरण
सिडको भवन, दक्षिण कक्ष, बेलापुर, नवी मुंबई -४०० ६१४

३. जनमाहिती अधिकारी -
**उत्तरवादी**
महाराष्ट्र जिवन प्राधिकरण
सिडको भवन, दक्षिण कक्ष, बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन दक्षिण कक्ष बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे अर्जदार यांना मध्यवर्ती कार्यालयाचे आदेश क्र. नियुक्ती /२००४/१९१९/आ-१/ दिनांक २७/०५/२००५ नुसार अधिक्षक पदावर पदोन्नती दिलेली असून सदरच्या आदेशात अधिक्षक या पदाचा दिनांक १९/०८/२००४ पासून मानीव दिनांक दिलेला आहे.

अर्जदार यांनी अधिक्षक पदाचा मानीव दिनांक मागितलेला नसतांना सुध्दा मानीव दिनांक दिलेला आहे. म्हणून शासनाच्या आदेशाची प्रत साध्या टपालाने पाठविण्यात यावी असे नमूद केलेले दिसते.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०९/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २४/०५/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती कार्यासन अधिकारी (आ-३) यांचेकडून १५ दिवसात प्राप्त करुन घ्यावी. व प्राप्त होणारी माहिती पुढील १० दिवसात अपीलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. व नंतर अपीलकर्ता यांना दि. १८/०६/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी सुध्दा अपीलकर्ता यांना दि.०७/०४/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**